# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०६/२/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२१) इतिवृत्त**

**मंगळवार** दिनांक **०६ फेब्रुवारी २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ३.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. श्री. गायकवाड दिलीप नारायण
3. श्री. गवळी रविकांत काशीनाथ
4. सौ. दलाल लता श्रीनिवास
5. श्री. दाभाडे मिलींद यशवंत
6. श्री. मुजीब आलमशाह खान
7. श्री. पांडे विनायक प्रभाकर
8. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
9. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
10. श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
11. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
12. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
13. श्री. सावंत मधुकर दामोधर
14. श्री. मो. जावेद मो. इसाक
15. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**<u>संवाद :</u>**

श्री.संजय शिरसाट : आजच्या सभेत जकात खाजगी करणा बाबतचा महत्वाचा प्रस्ताव विषय पत्रिकेवर आहे. मा.आयुक्त सभागृहात उपस्थित नाहीत. तेव्हा मा.आयुक्तांचा पदभार मा.उप आयुक्त (म.) यांचेकडे सोपविण्यात यावा म्हणजे जकात खाजगीकरणाच्या अनुषंगाने मा.उपआयुक्त सभागृहात खुलासा करतील.

मा.सभापती : जकात खाजगीकरणाचा प्रस्ताव विषय पत्रिकेवर असला तरी इतरही महत्वाचे प्रस्ताव विषय पत्रिकेवर आहेत.

सौ.लता दलाल : आजच्या विषय पत्रिकेसोबत मागील सभेचे इतिवृत्त मिळालेले नाही. मी मागच्या दोन सभेपुर्वी या सभागृहात महत्वाच्या विषयावर चर्चा केलेली आहे. त्याअनुषंगाने या सभेच्या वेळी तसेच मागच्या सभेच्या वेळी मागील सभांचे इतिवृत्त मिळालेले नाही. त्यामुळे मागील दोन सभेत केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने सभागृहात चर्चा करावयाची असल्यास इतिवृत्त न मिळाल्याने त्यावर गांभीर्याने चर्चा करता येत नाही.

मा.सभापती : आजच्या विषय पत्रिकेवर इतिवृत्त मंजुरीबाबतचा विषय घेतलेला नाही त्यामुळे इतिवृत्त मंजुरीचा विषय ज्यावेळी सभागृहापुढे येईल तेव्हा त्यावर आपल्याला चर्चा करता येईल.

श्री.रविकांत गवळी : माझ्या वार्डात बऱ्याच ठिकाणी अतिक्रमण होत आहे. माझ्या विभागाशी संबंधीत इमारत निरीक्षक १ महिन्याच्या रजेवर गेलेले आहेत तसेच प्रशासकीय अधिकारी सुध्दा २ महिन्याच्या सुटीवर गेलेले आहेत तेव्हा माझ्या वार्डात होत असलेल्या अतिक्रमणा बाबतची माहिती कोणाला सांगायची.

मा.सभापती : उपआयुक्त (म)यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त (म) : प्रशासकीय विभागात ७ इमारत निरीक्षक आहेत. त्यापैकी २ इमारत निरीक्षक रजेवर आहेत. इमारत निरीक्षकांना जे मोबाईल फोन नं.दिले होते ते पुर्वीच्याच इमारत निरीक्षकांकडे आहेत. नवीन इमारत निरीक्षकांना मोबाईल फोन नंबर मिळालेले नाहीत. प्रशासकीय अधिकारी यांनी वैयक्तीक कारणासाठी ३० दिवसाची रज प्रशासनाकडे मागीतली आहे. प्रशासकीय अधिकारी यांचा पदभार सहाय्यक आयुक्त यांच्याकडे प्रस्तावित आहे.

श्री.रविकांत गवळी : माझ्या माहितीप्रमाणे ६ इमारत निरीक्षक दिलेले आहेत त्यापैकी ३ इमारत निरीक्षक ज्या दिवशी रूजु झाले त्या दिवसानंतर १५ दिवसापासुन रजेवर गेलेले आहेत. आणि सध्या प्रशासकीय अधिकारी हे पण रजेवर गेलेले आहेत. सभागृहाला खुलासा केल्याप्रमाणे प्रशासकीय अधिकारी पदाचा पदभार सहाय्यक आयुक्त-१ यांचेकडे देण्याचे प्रस्तावीत आहे. म्हणजेपदभार दिलेला नाही.

उप आयुक्त (म) : सहाय्यक आयुक्त-१ यांना प्रशासकीय अधिकारी यांचा पदभार देण्याचे प्रस्तावित आहे. त्याबाबतचा आदेश आजसंध्याकाळ पर्यंत निर्गमीत करण्यात येईल.

श्री.संजय शिरसाट : प्रशासनास इतर संचिका मा.आयुक्तांकडे जऊन सही करून आणता येतात मग प्रशासकीय अधिकारी १५ दिवसापासुन रजेवर असतांना त्यांच्या पदभारा बाबतच्या संचिकेवर मा.आयुक्तांची सही का घेण्यात आली नाही. आणि आजपर्यंत पदभार देण्याचे आदेश का देण्यात आले नाही. आणि सभागृहाला पदभार सोपविण्याचे प्रस्तावित आहे. असा खुलासा केला जतो ते कितपत योग्य आहे.

मा.सभापती : यासंदर्भात मा.उप आयुक्त (म) यांनी खुलासा करावा. की प्रशासकीय अधिकारी यांनी रजेचा अर्जदिल्यानंतरही त्यांचा पदभार दुसऱ्या अधिकाऱ्याकडे देण्याबाबत कार्यवाही का केली नाही.

श्री.विनायक पांडे : प्रशासकीय अधिकारी यांचा पदभार देण्याबाबतच्या खुलाशा बरोबरच प्रशासकीय विभागात जे इमारत निरीक्षक ते प्रशासकीय विभागात रूजु झाले किंवा नाही याचाही खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : यासंदर्भात उप आयुक्त (म.)यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त (म) : इमारत निरीक्षकांच्या बदल्या १९ डिसेंबर २००६ रोजी करण्यात आल्या होत्या ते सर्व इमारत निरीक्षक त्यांना दिलेल्या ठिकाणी रूजुझालेले आहेत.

श्री.संजय शिरसाट : मा.उपआयुक्त यांनी १ मिनीटात उत्तर दिलेले आहे. इमारत निरीक्षकांच्या बदल्याबाबत संदर्भासहीत सभागृहात खुलासा करण्यात यावा. उपआयुक्त (म.) यांनी त्रोटक उत्तर दिलेले आहे हे योग्य नाही.

मा.सभापती : प्रशासकीय विभागात बदली करण्यात आलेले इमारत निरीक्षक त्या ठिकाणी रूजु झाले आहेत किंवा नाही. रूजुझाले नसले तर रूजुहोणार आहेत किंवा नाही.किती जण रूजुझाले आहेत आणि जे निरीक्षक रूजु झाले नाहीत रूजु होणार आहेत किंवा नाही आणि जे रूजु

झाले नाहीत त्यांच्या जगेवर पर्याया व्यवस्था करणार आहेत किंवा नाही. याबाबत खुलासा करावा. याबाबत सहाय्यक आयुक्त यांनी खुलासा करावा.

सहाय्यक आयुक्त -१ : प्रशासकीय विभागातील ७ इमारत निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यांच्या जगेवर देण्यात आलेले ७ इमारत निरीक्षक रूजु झालेले आहेत. त्यापैकी २ इमारत निरीक्षक रजेवर गेलेले आहेत. प्रशासकीय अधिकारी हे २ तारखेपासुन रजेवर आहेत. त्यांचा पदभार सोपविण्या बाबतची संचिका मा.उप आयुक्त(म.) यांचेकडे सादर केली आहे.

श्री.संजय शिरसाट : प्रशासकीय विभागाचा पदभार सोपविण्याची संचिका अद्यापही प्रस्तावित आहे. किंवा या शहराला अतिक्रमण विभागाची जरूर नाही का? पदभार देण्याबाबतची संचिका अद्यापही उप आयुक्त यांचेकडे पडून आहे ती आयुक्तांकडे गेलेलीच नाही.

मा.सभापती : प्रशासकीय विभागाचा पदभार सहाय्यक आयुक्त यांचेकडे सोपविण्याचे आदेश आजच निर्गमीत करण्यात यावे.

श्री.रविकांत गवळी : सन १९८५-८६ मध्ये प्रशासकीय विभागात १० ते १५ इमारत निरीक्षक कार्यरत होते. आजरोजे या विभागात फक्त ६ इमारत निरीक्षक आहेत. या ६ इमारत निरीक्षकांची या विभागात काम करण्याची इच्छा नाही. आज शहराच्या हद्दीत दुपटीने वाढ झालेली आहे. जे इच्छुक कर्मचारी आहेत त्यांना काम करू द्यायचे नाही आणि जे इच्छुक नाहीत त्यांना थोडसं अतिक्रमण होत असेल तर संबंधितांना नोटीस द्यावी लागेल. ज्या विभागाची ज्यांना माहिती नाही असे इमारत निरीक्षक त्या विभागात ठेऊन काय उपयोग. गुंठेवारी नियमानुसार २००१ पुर्वीची बांधकामे आपण नियमीत करून देत आहोत. माझ्या वार्डात २२५ एकरामध्ये झु-सफारीचा प्रस्ताव आहे. त्यातील ३/४ एकर मध्ये २०×३० चे लहान लहान प्लॉट पाडले जतात. असे प्लॉट होऊ द्यायचेत का? अशा प्रकारे पाडण्यात आलेले लहान लहान प्लॉट गरीब नागरीक विकत घेतात.

श्री.त्र्यंबक तुपे : शहरात नगर परीषद अस्तित्वात असतांना ४ इमारत निरीक्षक कार्यरत होते. महापालिका अस्तित्वात आल्यानंतर या विभागात ८ इमारत निरीक्षक होते. महापालिकेत प्रशासक असतांना ८ इमारत निरीक्षकांची महाराष्ट्र शासनाच्या मंजुरीने भरती करण्यात आली होती. महाराष्ट्र शासनाच्या मंजुरीने भरती करण्यात आलेले ८ इमारत निरीक्षक अधिक सध्याचे ४ इमारत निरीक्षक कोठे आहेत. शासनाने नियुक्त केलेले इमारत निरीक्षक असतांना इतर कर्मचाऱ्यांकडून का काम करून घेण्यात येते. याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.मुजीब खान : सभागृहात अतिक्रमणाबाबत चर्चा होत आहे. याशिवाय कार्यालयाच्या बाहेरही अतिक्रमणाबाबत नागरीकांचा मोर्चा आलेला आहे. विशेष महत्वाची बाब म्हणजे महानगरपालिका कार्यालयाच्या बाजुला अतिक्रमण होत आहे. या सभागृहात नाले, नदी, यांच्या ओव्हरफ्लो बाबत चर्चा झालेली आहे. आज कार्यालयाच्या बाजुला नाल्यावर भरती केली जत आहे. त्यामूळे नाल्याच्या आजुबाजूला असलेल्या घरांमध्ये पावसाळा नसतांनाही पाणी शिरत आहे. तीन दिवसापासुन नागरीक निवेदने देत आहेत मोर्चे आणले जत आहे. तरीही प्रशासन याबाबत शांत का आहे. या निवेदनात नागरीकांनी काही नगरसेवकांच्या नावाचाही उल्लेख केलेला आहे. नाल्याचे दुर्गंधीयुक्त पाणी बाजूला असलेल्या मस्जेद मध्ये जत आहे. याबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : सर्व प्रथम स.स.श्री.त्र्यंबक तुपे यांनी इमारत निरीक्षकांबाबत जे मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यानुषंगाने इमारत निरीक्षकांना शासनाची मंजुरी आहे काय याचा खुलासा सहाय्यक आयुक्त यांनी करावा.

सहा.आयुक्त-१ : महानगरपालिकेच्या अस्थापनेवर दुय्यम आवेक्षक या पदावरील कर्मचाऱ्यांची इमारत निरीक्षक म्हणून नियुक्ती केली जते. शासनाने विशिष्ट १२ कर्मचाऱ्यांची इमारत निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे यासंदर्भात माहिती घेऊन सभागृहाला खुलासा करण्यात येईल.

श्री.त्र्यंबक तुपे : १२ इमारत निरीक्षक असतांना या शहरात फक्त ५ ते ६ इमारत निरीक्षक आहेत. शासनाने १२ इमारत निरीक्षकांची नेमणूक केलेली असतानाही इमारत निरीक्षक या पदाचा कारभार त्यांच्याकडे देण्यात येत नाही आणि ज्या कर्मचाऱ्यांना इमारत निरीक्षक म्हणून या पदावर देण्यात आले आहे त्यांची या विभागात काम करण्याची इच्छा नाही. बदली होईपर्यंत हे कर्मचारी काम करण्यास तयार नाहीत. किंवा असे असेल तर हा विभाग चालणार कसा.

मा.आयुक्त : शासनाची कोणत्याही पदाकरीता नावासह मंजुरी येत नाही पण इमारत निरीक्षकांचे जे पद आहे निरीक्षकाचे जेपद आहे ते पद दुय्यम आवेक्षकाच्या समकक्ष आहे का आणि ते बदली पद आहे किंवा नाही.

सौ.लता दलाल : महापालिकेने आर.आर. तयार केलेले आहेत. या आर.आर.नुसार इमारत निरीक्षक पदासाठी अर्हता काय असावी. गुणवत्ता काय असावी ही बाब त्यात नमुद असेल त्याकडे प्रशासनाचे लक्ष नसावे असे वाटते. याशिवाय शहराची लोकसंख्या किती आहे विस्तार किती झालेला आहे. या विस्तारानुसार किती लोकसंख्येला किती इमारत निरीक्षक असावेत याचाही विचार होणे आवश्यक आहे. आणि विशेष बाब म्हणजे कर्मचाऱ्याची इच्छा आहे किंवा नाही हा मुद्दा महत्वाचा नसुन कर्मचाऱ्याला दिलेले काम त्यांनी पार पाडले पाहिजे. महापालिकेमध्ये जी पदे भरली जतात ती शासनाच्या नॉर्म्स प्रमाणेच भरली जतात. शासनाचे नॉर्म्स आणि आर.आर.नुसार सध्या असलेल्या इमारत निरीक्षकांच्या संख्येत वाढ झाली पाहिजेहाही मुद्दा महत्वाचा आहे.

श्री.रविकांत गवळी : स.सदस्य तथा मा.उप महापौर सौ.लता दलाल यांनी जे खुलासा केलेला आहे त्याबद्दल आमचे दुमत नाही. पण ज्या इमारत निरीक्षकांची या विभागात काम करण्याची इच्छा नाही त्याचा त्रास इतरांनी का सहन करावा? ही बाब प्रशासनाच्या लक्षात येत नाही का?

श्री.त्र्यंबक तुपे : महापालिकेत प्रशासक कार्यरत असतांना त्यांनी इमारत निरीक्षकांची भरती करतांना शासनाची मंजुरी घेतलेली आहे. या ८ अधिक ४ इमारत निरीक्षकांना त्यबाबतचे प्रशिक्षण ही देण्यात आलेले आहे.

मा.सभापती : स.स.श्री.मुजीब आलम शाह खान यांनी महानगरपालिकेच्या कार्यालयाला लागुन असलेल्या नाल्याबाबत जे प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याबाबत उप आयुक्त (म.) यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त (म.) : स.सदस्य श्री.मुजीब आलम शाह यांनी नाल्यावरील अतिक्रमणाबाबत जे मुद्दा उपस्थित केलेला आहे. नाल्याच्या ज्या हद्दी आहेत त्याचे मार्कींग जवळपास पुर्ण झालेले आहे. महापालिकेच्या मागच्या बाजुच्या नाल्याबाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याबाबत नगर

रचना विभागाकडून नाल्याच्या हद्दीची मार्कींग घेतली जईल व त्यावर उद्या कार्यवाही केली जईल.

श्री.मुजेब खान : हे प्रकरण गेल्या ४ दिवसापासुन चालू आहे. यात एका व्यक्तीची तक्रार नसून ३ ते ४ दिवसापासुन या संबंधाने मोर्चा काढला जत आहे लोकांच्या घरात पाणी जत आहे. महापालिका कार्यालयाच्या बाजुला असलेल्या नाल्यात भरती केली जत असताना अधिकारी नगर रचना विभाकडून माहिति घेऊन कार्यवाही केली जईल असे सभागृहात सांगत आहेत. नाल्यातुन पाण्याचा प्रवाह वाहून जण्याच्या मोऱ्यापर्यंत भरती केलेली आहे. ही सर्व भरती नगर सेवक उभा राहून करीत आहे. निवेदनामध्ये नगर सेवकाच्या नावाचा उल्लेख आहे. तेव्हा हे प्रशासन नगर सेवकाच्या दबावात आहे काय. लोकांच्या घरात पाणी शिरत आहे. सभा तहकूब करून पाहणी करण्यात यावी म्हणजे खरी परिस्थिती आपल्या लक्षात येईल. स.सदस्याचे सभासदत्व रद्द झाले पाहिजे

श्री.त्र्यंबक तुपे : स.स.श्री.मुजेब आलम शाह यांनी जे मुद्दा उपस्थित केला आहे त्यातील निवेदनात कुठल्या सदस्याचे नाव आहे. याचा खुलासा सभागृहात देण्यात यावा. आणि कोण अतिक्रमणाला मदत करत आहे याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.संजय शिरसाट : कोणताही विषय सभागृहात चर्चिला जत असेल आणि त्याबाबतच्या निवेदनात सदस्याच्या नावाचा उल्लेख केला असेल आणि स.सदस्यांच्या हातात निवेदनाची प्रत आहे तर त्यांनी त्या सदस्याच्या नावाचा उल्लेख सभागृहात करावा.

श्री.मुजेब खान : प्रशासनाकडे निवेदनाची प्रत आहे तेव्हा त्यांनी तिन्ही नावे सभागृहाच्या समोर आणली पाहिजे

मा.आयुक्त : स्थायी समितीची सभा संपल्यानंतर उप आयुक्त (म.)कार्यकारी अभियंता (ड्रे.वि.) आणि सहा.संचालक नगर रचना प्रकरणाबाबत प्रत्यक्ष पाहणी करतील. आणि रात्रीपर्यंत अहवाल देतील.

श्री.मो.जवेद इसाक : शहरातील बऱ्याच रस्त्याच्या जगेचे महापालिकेने भूसंपादन केले आहे. संपादीत जगेचा मोबदलाही दिला आहे पण प्रत्यक्षात संपादीत केलेली जमीन मनपाच्या ताब्यात नाही. उदा.रंगारगल्ली येथे श्री.बोंबले तसेच चेलीपुरा येथे श्री.मोहम्मद खान यांना मावेज देण्यात आलेला आहे. याबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त : महानगरपालिकेतर्फे रस्ते आणि इतर प्रकरणात जेभूसंपादन करण्यात आले आहे ज्या बाबत मागील १० वर्षाची यादी तयार करण्याचे काम चालू आहे येत्या ४-५ दिवसात हे काम पुर्ण होण्याची शक्यता आहे.आवश्यक माहिति तयार झाल्यानंतर ती आपल्यासमोर ठेवली जईल.

श्री.मुजेब खान : रोशनगेट ते आझाद चौक पर्यंतच्या रस्त्याचे भूसंपादना बाबत बऱ्याच नागरीकांना मावेज देण्यात आलेला आहे याबाबत नगर रचना विभागातर्फे डिमार्केशन करून त्याचा नकाशाही तयार करण्यात आलेला आहे. पण त्याबाबत आजपर्यंत कार्यवाही झालेली नाही किंवा अतिक्रमण हटविलेले नाही. याबाबत नगर रचना विभागाकडे चौकशी केली असता ते भूसंपादन कार्यालयाकडे बोट दाखवतात आणि भूसंपादन विभागाकडे चौकशी केली असता ते नगर रचना विभागाकडे बोट दाखवितात तेव्हा सर्वांना एकत्र करून त्यावर योग्य तो निर्णय घेतला पाहिजे

श्री.हिम्मतराव दाभाडे : अतिक्रमणाबाबत माझा विषय नवीन आहे प्रभाग **फ** मध्ये बियर बारची दुकान आहे. या बियरबार वाल्याने नाल्यावर १०/१५ फुटाचे अतिक्रमण केलेले आहे. महानगरपालिका वार्ड ऑफीसच्या बाजुला अतिक्रमण होत असतांना ते आपण केव्हा काढणार तसेच एकनाथ नगर येथील डी.पी जवळील टपरी अद्याप उठवली नाही.

मा.सभापती : उप आयुक्त(म.)यांनी स.स.श्री.हिम्मतराव दाभाडे यांनी उपस्थित केलेल्या दोन्ही मुद्यांवर खुलासा करावा.

उप आयुक्त (म.) : स.सदस्य यांनी जे मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याअनुषंगाने प्रभाग कार्यालय **फ** येथील बियर बारचे अतिक्रमणाबाबत इमारत निरीक्षक यांच्याकडून माहिती घेऊन या दोन्ही प्रकरणाबाबत पुढील कार्यवाही केली जईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : आतापर्यंत सभागृहात जेजेप्रश्न उपस्थित केले त्याबाबत अधिकारी टाळाटाळीचे उत्तर देतात त्यांच्यावर कार्यवाही का केली जत नाही.

मा.आयुक्त : गुंठेवारी मिटींगच्या संदर्भात वार्ड कार्यालय **फ** मध्ये गेलो असता वार्ड ऑफीसर यांचेमार्फत बियरबारचे अतिक्रमण आहे का आणि बियरबारला कायदेशीर परवानगी आहे का याची माहिती घेऊन त्याबाबत मनपा आणि पोलीस यांचे मार्फत कार्यवाही केली जईल.

श्री.रविकांत गवळी : गेल्या १० महिन्यापासुन मी सिडको/हडको मधील अतिक्रमणाबाबत प्रश्न उपस्थित करीत आहे प्रत्येक वेळेस असे सांगण्यात येते की स्थायी समितीची मिटींग संपल्यानंतर याबाबत कार्यवाही करण्यात येईल. पण प्रत्यक्षात अद्यापपर्यंत कार्यवाही झालेली नाही माझ्या वार्डच्या बाजुला मुस्लीम समाजचे कब्रस्तान आहे. या कब्रस्तानात अतिक्रमण झाले आहे सदर अतिक्रमण काढण्याची मागणी नागरीक करीत आहेत.

मा.सभापती : स.सदस्य श्री.गवळी यांनी ज्या अतिक्रमणा संबंधी मुद्दा उपस्थित केला आहे त्या अतिक्रमणाबाबत येत्या ३ दिवसात कार्यवाही होणे आवश्यक आहे. या अतिक्रमणाबाबत जी कार्यवाही झाली त्याची माहिती स.सदस्य यांना लेखी स्वरूपात देण्यात यावी. अतिक्रमणाबाबत स.सदस्यांनी या संदर्भात चर्चा केली आहे अतिक्रमणासंबंधाने शहरातील अनेक तक्रारी आहेत. प्रशासकीय विभाग या अनुषंगाने योग्य ते काम करताना दिसत नाही. तेव्हा प्रशासकीय विभागात कायमस्वरूपी सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी, त्याचबरोबर हा विभाग सक्षम करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : अतिक्रमण विभागाचे अधिकारी श्री.निकम साहेबांना भेटलो आणि विचारले असता त्यांना अतिक्रमणाबाबत काय झाले असे विचारले असता ५/५० लोक तेथे आले आणि आमच्यावर दबाव टाकला असे उत्तर त्यांनी दिले. दबाव टाकल्यानंतर अतिक्रमण हटत नसेल तर ते अतिक्रमण आपण हटवायचे नाही का?

मा.सभापती : अतिक्रमण विभागात सक्षम अधिकारी व सक्षम इमारत निरीक्षक देण्याबाबत प्रशासनास सुचना देण्यात आलेल्या आहेत.

श्री.त्र्यंबक तुपे : कर्मचाऱ्यांना जेकाम दिले आहे ते त्यांनी नियमाप्रमाणे केले पाहिजे शासनाने ज्या १२ इमारत निरीक्षकांची नेमणूक केली आहे त्यांच्याकडून काम घेण्यात यावे. ज्यांनी या विभागात काम केले आहे त्यांच्याकडून काम करून घेतले पाहिजे अतिक्रमणाबाबत महानगरपालिकेचे लाखो रूपये खर्च होतात याकडे प्रशासनाने लक्ष दिले पाहिजे

मा.आयुक्त : आर.आर.मध्ये इमारत निरीक्षकांचे स्वतंत्र्य कॅडर असेल तर त्यांच्या बदल्या करता येणार नाही. आणि मंजुरीमध्ये संख्या १२ असेल तर दुय्यम आवेक्षक पदाच्या त्याठिकाणी बदल्या होतील.

श्री.त्र्यंबक तुपे : गुंठेवारी बाबत मा.आयुक्त व मा.पदाधिकारी यांचे अभिनंदन. गुंठेवारीच्या संदर्भाने नागरीकांमध्ये जनजगृती करण्यात येत आहे. परंतु गुंठेवारीच्या रकमेबाबतचे चलन नागरीकांना महापालिकेतील बँकेत येऊनच जमा करावे लागतील. महानगरपालिकेत असलेल्या बँकेत ग्राहकांची गर्दी असते आणि काही भागातील नागरीकांना ही बँक दुर पडते तेव्हा प्रत्येक वार्डात असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेत गुंठेवारीचे चलन भरण्याबाबत नागरीकांना परवानगी देणे योग्य होईल.

मा.आयुक्त : गुंठेवारी बाबतचे चलन भरण्यासाठी वार्ड इंजिनियर यांनी त्यांच्या भागातील राष्ट्रीयीकृत बँकेचे नाव सुचवावे त्याप्रमाणे नागरीकांना त्या बँकेत चलन भरण्याची परवानगी देण्यात येईल.

सौ.लता दलाल : एक सुचना अशी आहे की, गुंठेवारीच्या कामासाठी ज्या एजन्सी नेमलेल्या आहेत त्या एजन्सीकडून गुंठेवारी नसलेल्या भागातील १० नागरीकांना नोटीसा दिल्या गेल्या आहेत. या नागरीकांकडे बांधकाम परवानगी आहे. याबाबत संबंधित एजन्सीला आवश्यक त्या सुचना देण्यात याव्यात.

श्री.मुजेब खान : आजच्या औरंगाबाद टाईम्स या उर्दु दैनिकात स.नगरसेवकाच्या नावाचा उल्लेख करून रोशन गेट येथील दरवाज्याच्या कामाबाबत बातमी प्रसिध्द झाली आहे वस्तुत: स.नगरसेवकाच्या नावाचा उल्लेख करून बातमी प्रसिध्द होणे योग्य नाही. जेव्हा याच सभागृहात गेल्या १० महिन्यापासुन रोशनगेट येथील दरवाज्याच्या कामाबाबत मंजुरी देण्यात आली आहे. त्यासाठी ५ लाखाचे अंदाजपत्रक ही मंजुर करण्यात आले होते. या रकमेत दरवाज्याचे काम होत नसल्यामुळे सुधारीत अंदाजपत्रकासही मंजुरी देण्यात आली आहे. नगर सेवकाची बदनामी करण्याच्या दृष्टीने वृत्तपत्रातील बातमी महानगरपालिकेकडून दिली गेली आहे. तेव्हा हे काम केव्हा होणार याचा खुलासा व्हावा.

मा.सभापती : अतिरीक्त शहर अभियंता यांनी याबाबत खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : रोशनगेट येथील दरवाज्याच्या दुरूस्तीबाबत दोन वेळा निविदा काढण्यात आल्या होत्या. या निविदेमध्ये ५०% जस्त दराने या निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे त्या प्रशासनाने स्विकारल्या नाहीत. याशिवाय अंदाजपत्रकात ज्या त्रुटी होत्या त्याबाबत इन्टॅक या संस्थेशी संपर्क साधून या कामाचे सुधारीत कामाचे अंदाजपत्रक तयार केले आहे. त्या कामाचे टेंडर काढण्यात आले आहे. ते अंतीम करून येत्या ८/१० दिवसात काम सुरू होईल.

मा.आयुक्त : रोशनगेट येथील वार्डाच्या निवडणुकीची आचारसंहीता असल्यामुळे टेंडरच्या कामाला थोडा उशीर झालेला आहे. बाकी दरवाज्याचे कामे पुर्ण झालेली आहे.

श्री.दिलीप गायकवाड: सायंदैनिकात स.नगर सेवकाच्या नावाचा उल्लेख असलेली बातमी प्रसिध्द झालेली आहे. वृत्तपत्रातील बातमीनुसार या यादीत नगर सेवकाच्या नावाचा जे उल्लेख आहे. त्या यादीत नगरसेवकाने स्वत:चे नांव टाकले आहे किंवा आपल्या कर्मचाऱ्यांनी पैसे घेऊन काम केले आहे. याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री.मधुकर सावंत : गेल्या काही दिवसामध्ये शहरातील सायंदैनिकामध्ये यादी प्रसिध्द झालेली आहे. याबाबत प्रशासनाला २/३ मुद्याबाबत खुलासा मागणार आहे. दारिद्रय रेषेखाली नेमके कोणते लोक येतात याचा प्रथम प्रशासनाने खुलासा करावा.

मा.सभापती : प्रकल्पअधिकारी यांनी याबाबत खुलासा करावा.

प्रकल्प संचालक : स.सदस्य श्री.सावंत साहेब यांनी विचारलेल्या प्रश्नाप्रमाणे दारिद्रय रेषेखालील लोकांमध्ये प्रामुख्याने ज्यांचे दरडोई दरमहा रूपये ५९१/- उत्पन्न आहे. असे कुटुंब. मा.महापौर यांनी जेपत्र दिले आहे त्यानुसार चौकशी सुरू केली.

श्री.संजय शिरसाट : दारिद्रय रेषेबाबत आपण जे सर्वे केला त्या यादीत स.स.श्री.मधुकर सावंत यांच्या नावाचा उल्लेख असल्याची बातमी मी वृत्तपत्रात वाचली आहे.

श्री.मधुकर सावंत : दारिद्रय रेषेखालील नागरीकांचा सर्वे करतांना त्या नागरीकाचे राहणीमान कसे असले पाहिजेत्याच्या घरात काय काय वस्तु असल्या पाहिजेयाची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : दारिद्रय रेषेबाबतच्या क्रायटेरीयाची माहिती प्रकल्प संचालक यांनी द्यावी.

प्रकल्प संचालक : ज्यांच्याकडे पक्के घर नाही किंवा टेलीफोन नाही किंवा रंगीत टि.व्ही नाही अशा कुंटूबांचा दारिद्रय रेषेमध्ये समावेश होतो. महानगरपालिकेतर्फे जेसर्वेक्षण करण्यात आले आहे त्यानुसार शहरात ७४२३० कुटुंबाचे आपण सर्वेक्षण केलेले आहे. त्यापैकी ५६४९५ कुटुंब हे दारिद्रय रेषेखाली असल्याचे त्याने स्वत: घोषीत केलेले आहे आणि त्याप्रमाणे आपण प्रपत्र **ब** भरून घेतले आहे. आणि १७७३५ कुटुंबांनी स्वत:हून ते दारिद्रय रेषेखाली येत नसल्याचे घोषीत केल्याने त्यांचे आपण प्रपत्र **अ** भरून घेतेले आहे.

श्री.मधुकर सावंत : या शहरामध्ये १६०००० कुटुंब होते या कुटुंबात सरासरी ५,६ व्यक्ती असतील त्याप्रमाणे ९/१०.५० लाख लोक होतात. जर ७४००० कुटूंब दारिद्रय रेषेखाली येतात तर या शहरात ५०% लोक दारिद्रय रेषेखाली येतात का.

प्रकल्प संचालक : यामध्ये महानगरपालिकेचे लोक ज्यावेळी सर्वेक्षणाला गेले होते त्यावेळी प्रपत्र **अ** नुसार जेलोक दारिद्रय रेषे खाली आहेत त्यात कुटुंब प्रमुख प्रपत्र **अ** प्रमाणे मी दारिद्रय रेषेखाली आहे असे घोषीत करीत असतो. त्यानंतर प्रपत्र **ब** भरून घेण्यात येते. यात १७७३५ कुटुंबांनी त्यांचे कुटुंब दारिद्रय रेषेखाली येत नसल्याबाबत प्रपत्र अ भरून दिल्यामुळे त्या कुटुंबाचे आपण प्रपत्र **ब** भरून घेतलेले नाही. ज्या कुटुंबांनी दारिद्रय रेषेखाली आहोत असे घोषीत केले आहे. त्या कुटुंबाचे आपण प्रपत्र **ब** भरून घेतलेले आहे.

श्री.मधुकर सावंत : रमानगर हा भाग स्लम घोषीत आहे. यामध्ये किमान ७०० घरे आहेत.त्यापैकी ५०%घरे ही दारिद्रय रेषेखालील आहेत. रमानगरची जी यादी प्रसिध्द झाली आहे त्यामध्ये फक्त १३२ घरे दारिद्रय रेषेखाली आहे. यामध्ये सगळे नोकरदार/व्यावसायीक/व्यापारी या यादीत आहेत. यात ३२ नंबरवर माझ्याही नावाचा समावेश आहे. सर्वेक्षणासाठी ज्या महिला कर्मचारी येत होत्या त्या झाडाखाली बसुन यादी तयार करीत होत्या. याची कल्पना त्यावेळचे झोन अधिकारी श्री.अयुब खान यांना दिली आहे. त्याकडे त्यांनी लक्ष दिले नाही. म्हणून ही यादी तयार झाली आहे. तयार झालेली यादी चुकीची/खोटी आहे.

मा.आयुक्त : दारिद्रय रेषेखालील यादी तयार करतांना पहिला मुद्दा हा मी दारिद्रय रेषेखाली आहे असे स्वत: घोषीत करण्याचा आहे. त्यानुसार जी व्यक्ती स्वत: घोषीत करते की मी दारिद्रय

रेषेखाली आहे. त्यानुसार पुढची यादी तयार केली जते.त्यानुसार या यादीत ज्यांची ज्यांची नावे आली आहेत त्यांचे सेल्फ डिक्लेरेशन आहे त्यांची नावे या यादीत आहेत.

सौ.लता दलाल : या ठिकाणी दोन महत्वाचे मुद्दे नमुद करावेसे वाटतात ते असे की, शहरातील प्रत्येक वार्डात दारिद्रिय रेषेखालील नागरीक आहेत. दारिद्रिय रेषेखालील नागरीकांचा सर्वे करण्यासाठी महानगरपालिकेने काही स्वयंसेवी संस्थांना नियुक्त केले होते. आजही शेकडो कुटुंब हे दारिद्रिय रेषेखाली आहेत आणि ज्यांची नावे यात आलेली नाही. यापैकी ज्या कुटुंबातील महिला भांडी घासतात त्यांच्या घरात आजही खरोखर कामावर गेले नाही तर उपासमार घडते. असे नागरीक पत्र्याच्या घरात राहतात त्यांच्या घरात कपडे व भांडे या व्यतिरीक्त काहीही नाही. अशा किती लोकांची नोंद या यादीत आहे. नसेल तर आम्हाला सांगा आम्ही अशी यादी पुरवितो. या अनुषंगाने प्रकल्प संचालक यांना वारंवार पत्र देण्यात आलेले आहे तरीही या यादीत त्याच चूका झालेल्या आहेत.

श्री.त्र्यंबक तुपे : दारिद्रिय रेषेखालील नागरीकांचा सर्वेच पुर्ण झालेला नाही अशा परिस्थितीत प्रकल्प संचालक यादी पाठविण्याची घाई का करता हे कळत नाही.

श्री.रविकांत गवळी : दारिद्रिय रेषेखालील नागरीकांची यादी प्रकल्प विभागाकडून घेतली असता यात घोषीत स्लम भागाच्या झोपडपट्टी व्यतिरीक्त ज्या भागात दारिद्रिय रेषेखालील नागरीक राहतात त्यांच्या नावाची नोंद यादीत नाही. इतर भागातील नागरीकांना तुम्ही घोषीत झोपडपट्टी किंवा दुर्बल घटकामध्ये येत नाही म्हणून त्यांची नावे वगळण्यात यावी असे सांगण्यात येते. मग हे नागरीक दारिद्रिय रेषेखाली येत नाही का?

मा.सभापती : स.स रविकांत गवळी यांनी जे मुद्दा उपस्थित केलेला आहे याचा खुलासा करावा.

सौ.लता दलाल : कालच्या दैनिक सामना वृत्तपत्रात दारिद्रिय रेषेखालील नागरीकांसाठी मोफत घरकूल योजना ही बातमी प्रसिध्द झालेली आहे. त्याअनुषंगाने काही व्यक्ती फॉर्मचे वाटप करीत आहेत. या बातमी नुसार नगरसेवकांकडे रहिवाशी प्रमाणपत्राकरीता रांगा लागलेल्या आहेत. तेव्हा अशी काही एजन्सी नेमली आहे का या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दुरध्वनीव्दारे अशी काही योजना आहे का याची माहिती घेतली आहे. याबाबत खुलासा व्हावा.

प्रकल्प संचालक : मा.उपमहापौर तथा स.सदस्य सौ.लता दलाल यांच्या सुचनेनुसार माहिती घेऊन महानगरपालिका अशा प्रकारचे सर्वेक्षण करीत नाही असा खुलासा वृत्तपत्रात जहीर केला आहे. यात महानगरपालिकेचा कुठलाही संबंध नाही, नागरीकांनी कुठलाही आर्थिक व्यवहार केलेला नाही.

श्री.संजय शिरसाट : दारिद्रिय रेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण हा विषय गंभीर स्वरूपाचा आहे या यादीत स.स.श्री.मधुकर सावंत यांचे नाव आले आहे अशा अनेक चुका झाल्या आहेत. या शहरातील अनेक वसाहती दारिद्रिय रेषेखालील नागरीक राहतात अशा झोपडपट्टीत शासकीय योजनेची काम करून देणारे एजंट असतात. हे एजंट या नागरीकांकडून १००/२०० रूपये घेऊन योजनेची कामे करून देतात. अशावेळी नागरीक अक्षरश: व्याजने पैसे आणुन एजंटला देतात. सर्वसामान्यांना दिलासा देणाऱ्या ज्या योजना आहेत या योजनेच्या सर्वेक्षणात झालेल्या चुकांमुळे अनेक नागरीक या योजनेपासुन वंचीत राहत

आहेत हा विषय महत्वाचा आहे. तेव्हा या यादीची छाननी करून जहीरात स्वरूपात प्रसिध्द करावी.

श्री.त्र्यंबक तुपे : दारिद्रय रेषेखालील लोकांची जे यादी तयार झाली आहे ती चुकीची व अशुध्द आहे या यादीत गरजु लोकांच्या नावाचा समावेश नाही उलट ज्यांना गरज नाही अशा नागरीकांची नावे त्यात आहेत याबाबत कोणास जबाबदार धरणार यासाठी वृत्तपत्राव्दारे जहीर आव्हान देऊन ज्या नागरीकांना गरज नसेल त्यांची नावे वगळण्याबाबत आव्हान करण्यात यावे आणि गरजुनागरीकांपर्यंत ही योजना पोहचली पाहिजे

श्री.मिलींद दाभाडे : स.स.श्री.मधुकर सावंत यांचे नाव ज्याप्रमाणे दारिद्रय रेषेखालील यादीत आहे त्याच प्रमाणे माझ्या वार्डातील काही प्राध्यापकांची नावे या यादीत आहेत. या प्राध्यापकांना ३५०००/-रूपये पगार आहे.

श्री.मधुकर सावंत : दारिद्रय रेषेखालील यादी करीता जे फार्म भरून घेण्यात आले त्यावर माझी सही दाखवा असे माझे जहीर आव्हान आहे.

मा.सभापती : प्रकल्प अधिकारी यांनी स.स.श्री.मधुकर सावंत यांचा बी फार्म पुढील सभेत दाखल करावा. सर्वे झालेल्या यादीचे पुन्हा सर्वेक्षण करण्यात यावे. यासाठी पुर्वी जे कर्मचारी नियुक्त केले होते त्यांची पुन्हा नेमणूक करण्यात येऊ नये आणि या यादीत चुकीची नावे असतील तर ज्यांनी ही यादी तयार केली त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी तसेच खोटी माहिती भरून देणाऱ्या नागरीकावरही कार्यवाही करण्यात यावी.

श्री.मिलींद दाभाडे : दारिद्रय रेषेखालील यादी तयार करतांना ज्या चुका झालेल्या आहेत त्यांच्यावर काय कार्यवाही करणार याचा खुलासा करावा.

मा.सभापती : ज्या नागरीकांनी फार्म भरून दिले असतील तर त्यांच्यावर कार्यवाही होईल. ज्यांनी फार्म भरून दिले नसतील अशी ठिकाणी ज्यांनी सर्वे केला त्यांच्यावर कार्यवाही केली जईल.

श्री.मधुकर सावंत : माझ्या वार्डात २०० नागरीक असे आहेत ज्यांच्या घरी गॅस नाही त्यांना वेळेवर रॉकेल मिळत नाही अशा गरज असलेल्या लोकांची नावे यादीत नाही आणि ज्यांना गरज नाही त्यांची नावे यादीत आहेत.

मा.आयुक्त : दारिद्रय रेषेखालील लोकांची यादी तयार करण्याचे जे सर्वेक्षणाचे काम झाले त्यामध्ये आपण अशा नागरीकांच्या घरी जऊन त्यांच्याकडून प्रपत्र अ भरून घेण्यात येते. त्यावर ती व्यक्ती सही करते आणि मी दारिद्रय रेषेखाली आहे असे घोषीत करते. त्याचाच सर्वे केला जतो. दारिद्रय रेषेखाली ज्या व्यक्तीचे नाव आले आहे त्यांची **ए** फार्मवर सही असणे आवश्यक आहे. आणि **ए** फार्मवर त्या व्यक्तीची सही नसेल तर ज्यांनी सर्वे केला त्यांच्यावर कार्यवाही केली जईल.

श्री.संजय शिरसाट : अनेक पतसंस्था अशा झालेल्या आहेत की त्या हाताचे किंवा पायाचे अंगठे घेतात तेव्हा दारिद्रय रेषेखालील जे फार्म भरलेले आहेत त्या फार्मवर कोणाच्या तरी सह्या घेतल्या जतात. हे फार्म झाडाखाली बसुन भरले जतात म्हणून त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही झाली पाहिजे

श्री.त्र्यंबक तुपे : जर फार्मवर प्रोफेसरची सही असेल तर काय कार्यवाही करणार.

मा.आयुक्त : कोणताही गरीब नागरीक या योजनेपासुन वंचीत राहू नये म्हणून **ए** फार्म भरून घेतल्यावर ४०/५० प्रश्न असलेला **बी** फार्म भरून घेण्यात येतो त्यानंतर याची फिडींग झाल्यानंतर होय /नाही प्रमाणे यादी प्रसिध्द होते. याबाबत ३ वेळा वृत्तपत्रात जहीरात

दिलेली आहे. मोलकरणीचे काम करणाऱ्या ८/१० हजर लोकांची यादी प्राप्त झाली आहे. या दृष्टीने ज्यांची नावे यादीत समाविष्ट झाली आहेत ती कमी करून उर्वरीत यादीचे पुर्ण सर्वेक्षण येत्या १० दिवसात करून घ्यावे असे आदेशीत केले आहे. तसेच आणखी एकदा वृत्तपत्रात जहीर प्रगटन देण्यात येईल. दारिद्रय रेषेखालील योजनेच्या शासन आदेशाची प्रत सर्व स.नगरसेवकांना देण्यात येईल.

श्री.मधुकर सावंत : दारिद्रय रेषेखालील सर्वे करतांना सर्वे करणाऱ्या व्यक्तीने घरोघरी जाऊन त्या व्यक्तीचे घर स्लॅबचे आहे का कसे त्यांच्याकडे फोन आहे का गॅस आहे का या सर्व बाबीचा सर्वे केला पाहिजे

मा.आयुक्त : दारिद्रय रेषे खालील सर्वे करतांना सेल्फ डिक्लेरेशन झाल्यानंतर प्रपत्र **अ** भरून घेतले जते. त्यानंतर प्रपत्र **ब** ची उत्तरे भरून घेतली जतात.

सौ.लता दलाल : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे दारिद्रय रेषेखालील योजनेबाबत ३ वेळा वृत्तपत्रात प्रगटन दिल्याचा खुलासा सभागृहात करण्यात आला आहे. परंतु जेगरीब लोक आहेत ते रोजपेपर वाचत नाहीत. त्याचा या ठिकाणी काही उपयोग नाही ज्या कर्मचाऱ्याने सर्वेक्षण केले त्यांनी अशा नागरीकांच्या घरी जणे आवश्यक होते.

श्री.दिलीप गायकवाड: दारिद्रय रेषेखालील लोकांचा सर्वे करण्याचे काम करणारे कर्मचारी त्यांच्या घरी गेलेले आहेत. त्यांच्या जवळील फार्मवर त्या लोकांच्या सह्या असतील तर अशा लोकांवर कोणती कार्यवाही करणार याचा खुलासा झाला पाहिजे

मा.आयुक्त : सेल्फ डिक्लेरेशन मध्ये जर कोणी चुकीची माहिती दिली असेल तर याबाबत शासनाकडून ऑप्शन घेतले जईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : शहानुरमिया दर्गा ते सेव्हनहिल पर्यंतच्या रस्त्यावरील न्यायनगर भागातील बऱ्याचशा नागरीकांना गुंठेवारीच्या नोटीसा मिळालेल्या नाहीत. त्यापैकी काही २०/२५ लोकांनी गुंठेवारीची रक्कम भरलेली आहे. तरी त्या भागाचा कुठलाही विकास झालेला नाही तेव्हा न्यायनगर भागाचा सर्वे करून तेथील नागरीकांना नोटीसा देण्यात याव्यात व त्या भागाचा विकास घडवून आणावा.

मा.सभापती : विषय पत्रिकेला सुरूवात करण्यात येत आहे.

**विषय क्र.226 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, एन-2 रामनगर, सिडको येथे द्विवार्षिक पध्दतीने वृक्षसंवर्धन व विकास कामे करणे बाबतचे रक्कम रू.18,50,000/- चे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2005-2006 च्या जिल्हा दरसुचीनुसार तसेच उद्यान विभागाच्या (पार्क व उपवने) सन 2004-05 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च अर्थसंकल्प सन 2006-07 मधील सिडको भागात ग्रीन बेल्ट विकसीत करणे या लेखाशिर्षकाखाली असलेल्या तरतुदीतून करण्यात येणार आहे.

करीता एन-2 रामनगर, सिडको येथे द्विवार्षिक पध्दतीने वृक्षसंवर्धन व विकास कामे करणे बाबतचे र.रू.18,50,000/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.संजय शिरसाट : विषय क्र.२२६ हा कळालेला नाही त्याबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : अतिरीक्त शहर अभियंता यांनी याबाबत खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : सदरील काम हे सिडको एन-२ रामनगर येथे रस्त्याच्या मध्यभागी जेदुभाजक आहेत त्या ठिकाणी जस्त जगा उपलब्ध आहे. त्या दुभाजकाचे सौंदर्यीकरण करण्याचा हा प्रस्ताव आहे. यात काही शिल्पाकृती त्याच्या आजुबाजूला झाडे आणि हिरवळ करावयाची आहे.

सौ.लता दलाल : प्रस्तुत प्रस्तावात ग्रिनबेल्ट आणि वृक्षसंवर्धनचा उल्लेख आहे. त्यात शिल्पाकृतीचा संबंध येतो कुठे, म्हणजे१८,५०,०००/-ही रक्कम नेमकी कशासाठी आहे. तेव्हा संपुर्ण माहिती देण्यात यावी.

अति.शहर अभियंता : ग्रिनबेल्ट या लेखाशिर्षकाच्या तरतुदीतून हे काम करण्यात येणार आहे म्हणून याचा उल्लेख या ठिकाणी आलेला आहे.

मा.सभापती : विषय क्र.२२६ ला स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहातील चर्चेनुसार प्रस्तुत प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.227 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.आंबेडकरनगर(स्लम) येथील ग्रीव्हज् कंपनी समोरील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार र.रू.16,92,500/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2006-07 या आर्थिक वर्षात स्लम भागात पुनःर्डांबरीकरण या लेखा शिर्षातून करण्यात येत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मा.स्थायी समिती समोर सादर करण्याची शिफारस केलेली आहे.

तरी सदर कामासाठी र.रू.16,92,500/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.आंबेडकरनगर(स्लम) येथील ग्रीव्हज् कंपनी समोरील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.16,92,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.228 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, घनकचरा हाताळणी व व्यवस्थापन कामासाठी सखोल प्रकल्प अहवाल तयार करून घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने लोकल सेल्फ गव्हर्नमेंट,

मुंबई या संस्थेची Project Management Consultant म्हणून नियुक्ती करण्यासाठी रू.1.00 लक्ष (एक लक्ष रूपये) एवढा खर्च येणार आहे.

करीता लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई या संस्थेची घनकचरा हाताळणी व व्यवस्थापन कामासाठी Project Management Consultant म्हणून नियुक्ती करण्यासाठी व यासाठी येणाऱ्या र.रू.1.00 लक्ष च्या खर्चास मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा आयुक्त : घनकचरा व्यवस्थापनामध्ये तीन प्रकार आहेत. त्यात साफसफाई, घरोघरी जऊन कचरा उचलणे व वाहतूक अशी तीन महत्वाची कामे असतात. घनकचरा हाताळणी बाबत शासनाने एम.एस.डब्ल्यु जेनियम तयार केलेले आहेत त्यानुसार शहरातील साफसफाई व कचऱ्याबाबत कशा प्रकारे व्यवस्था करायला पाहिजे यासाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडे तज्ज्ञ उपलब्ध आहेत. त्यांच्याकडून मार्गदर्शन घेण्यात येणार आहे. तसेच मार्च २००७ नंतर सिडको बाबतही दरपत्रक काढावे लागेल. याबाबत एम.एस.डब्ल्यु. रूल २००० आणि मा.उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे कचरा व्यवस्थापन कसे हाताळले पाहिजेयाची माहिती घेण्यात येणार आहे. यासाठी अखिल भारतीय स्वराज्य संस्थेने १.०० लाखाचे टोकन दिलेले आहे त्यास सभागृहाने मंजुरी द्यावी.

सौ.लता दलाल : सन १९९० च्या दरम्यान महानगरपालिकेने मे शहा कन्सल्टंट यांना ड्रेनेजचा सर्वे करून देण्यासाठी नेमलेले होते. तेव्हा मे.शहा कन्सल्टंट यांनी दिलेल्या अहवालानुसार नियमाप्रमाणे आपण किती कामे केली त्यांचे किती नियम पाळतो. तेव्हा प्रस्तुत प्रस्तावानुसार संबंधित एजन्सी ही शासकीय असली तरी त्यांचे सर्व नियम आपण पाळणार आहोत का, यापुर्वीच्या अनुभवानुसार ज्या ज्या एजन्सीला महानगरपालिकेने कामे दिली त्या त्या एजन्सीच्या निर्देशाप्रमाणे आपण कामे केली असे आतापर्यंत कुठेच दिसुन आले नाही. तेव्हा स्थानिक स्वराज्य संस्था यांना जे आपण नेमणार आहोत त्यांच्या निर्देशाप्रमाणे कामे होणार आहेत का, याचा खुलासा करावा आणि पाणीपुरवठ्या बाबतही अशीच संस्था नेमावी व आतापर्यंत किती कामासाठी कन्सल्टंट नेमले याची यादी देण्यात यावी.

मा.आयुक्त : मा.उपमहापौर यांच्या सुचनेप्रमाणे येत्या १०/१५ दिवसात सदर संस्था पुर्ण डेव्हलपमेंन्ट करून २० दिवसात टेंडर ची कार्यवाही पुर्ण करून त्याच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सभागृहासमोर आणला जईल. या शिवाय ड्रेनेजबाबत पुढच्या स्टँडीग कमिटीमध्ये सभागृहासमोर येणार आहोत.

शहर अभियंता : शहा कन्सल्टंट यांनी ड्रेनेज बाबतचा पुर्ण सर्वे करून त्याची माहिती महानगरपालिकेला दिली होती. त्यासाठी त्यांनी त्यावेळी ६५.०० कोटीचे अंदाजपत्रक दिले होते. निधीअभावी त्यावेळी ही कामे झाली नव्हती. काही कामे आपण केली होती.

सौ.लता दलाल : शहर अभियंता सभागृहाला चुकीची माहिती देत आहेत. यातुन शहरातील लोखंडी पुल तसेच तरूण भारत जवळील नाल्यापर्यंत मेनहोल व सिव्हर लाईन टाकण्याचे

काम झाले होते. टाकण्यात आलेल्या लाईनचे काम शहा कन्सल्टंट यांच्या निर्देशाप्रमाणे न झाल्यामुळे असफल झालेल्या आहेत. त्यामुळे या कामासाठी खर्च झालेला पैसा व्यर्थ गेलेला आहे.

शहर अभियंता :शहा कन्सल्टंट यांनी ड्रेनेज लाईन आणि नाल्याच्या बाजुला रिटेनिंग वाल बांधणे अशा दोन बाबींचा त्यात समावेश होता. त्यानुसार शहा कन्सल्टंट यांच्या निर्देशाप्रमाणे बऱ्याच ठिकाणी लाईन टाकण्यात आल्या होत्या पण निधी अभावी आपण त्या पुर्ण करू शकलो नाही.

श्री.संजय शिरसाट : यासंदर्भाने एक छोटासा प्रश्न असा की शहा कन्सल्टंट यांच्या निर्देशाप्रमाणे शहरात किती मेनहोल आहेत.

सौ.लता दलाल : स.सदस्यांनी जे प्रश्न विचारला तो अत्यंत महत्वाचा आहे. त्यात शहा कन्सल्टंट यांच्या निर्देशाप्रमाणे शहरातील नाल्याची रूंदी किती असायला पाहिजे, लांबी किती असायला पाहिजे, सिव्हर लाईन किती व्यासाची असायला पाहिजे, किती उंचीचे किती रूंदीचे मेनहोल असायला पाहिजे त्यापैकी किती मेनहोल आज अस्तित्वात आहेत त्या मेनहोल मधून सिव्हर लाईन व्यवस्थित काम करतात की नाही असा उद्देश आहे.

मा.सभापती : पुढच्या स्थायी समितीमध्ये ड्रेनेजबाबतची सर्व माहिती शहर अभियंता यांनी तयार ठेवावी. प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा हाताळणी व व्यवस्थापन कामासाठी सखोल प्रकल्प अहवाल तयार करून घेणे आवश्यक असल्याने, लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई या संस्थेची घनकचरा हाताळणी व व्यवस्थापन कामासाठी Project Management Consultant म्हणून नियुक्ती करण्यासाठी व यासाठी येणाऱ्या र.रू.1.00 लक्ष च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.229 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरास विविध ऐतिहासिक स्थळांचा वारसा लाभलेला आहे. या स्थळांची जपवणूक करणे व परिसराचे सौंदर्यीकरण करून ऐतिहासिक स्थळांचा स्तर वाढविणेसाठी व अशा प्रकारची कामे करण्यासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होवू शकतो. याकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करून केंद्र शासनाकडे सादर करावयाचा आहे. केंद्र शासनातर्फे 25.00 कोटी निधी प्राप्त होवू शकतो. करीता या विषयातील खालील तज्ज्ञ व्यक्ती/वास्तुविशारद यांच्याकडून डी.पी.आर. प्राप्त करून घेणेसाठी खालील वास्तुविशारद ग्रुप यांची नियुक्ती करणे आहे.

1) श्री. शरयु धोंगडे
2) श्री. प्रसाद कुलकर्णी
3) श्रीमती अंजली व किरण कलमदाणी

सदर वास्तुविशारद ग्रुप यांनी सदरील प्रकल्पाचा सविस्तर अहवाल तयार करून त्यासाठी लागणारा निधी शासन स्तरावर पाठपुरावा करून प्राप्त करणे, तसेच प्रत्यक्ष काम करतांना त्यावर सुपरव्हीजन व कन्सल्टींग करण्याची संबंधीत वास्तुविशारद ग्रुपवर जबाबदारी राहील. याकरीता वास्तुविशारद ग्रुपला एकत्रित मानधन म्हणून र.रू.2.00 लक्ष देणे बाबतच्या प्रस्तावास मा.आयुक्तांनी मंजुरी देवून स्थायी समिती सभेपुढे प्रस्ताव ठेवण्यासाठी शिफारस केलेली आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील विविध ऐतिहासिक स्थळांची जपवणूक करण्यासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त व्हावा याकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करून केंद्र शासनाकडे सादर करण्याकरीता विषयातील तज्ज्ञ व्यक्ती/वास्तुविशारद यांच्याकडून डी.पी.आर. प्राप्त करून घेणेसाठी खालील वास्तुविशारद ग्रुप यांची नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

1) श्री. शरयु धोंगडे
2) श्री. प्रसाद कुलकर्णी
3) श्रीमती अंजली व किरण कलमदाणी

सदर कामाकरीता वास्तुविशारद ग्रुपला एकत्रित मानधन म्हणून र.रू.2.00 लक्ष देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.230 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको एन-7 येथील जुने शॉपींग सेंटर समोर छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारणेसाठी सदरील कामाचे सविस्तर नकाशे उदा.प्लॅन, इलेव्हेशन सेक्शन, आरसीसी डिझाईन इ. तयार करणे, तसेच महाराष्ट्र शासनाच्या मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांची चबुतऱ्यास/आराखड्यास मान्यता घेणेसाठी नकाशे सादर करणे तसेच प्रस्तुत कामावर देखरेख करण्यासाठी वास्तुविशारद श्री.महेश ल. कुलकर्णी यांची नियुक्ती करून त्यांचे मार्फत उपरोक्त कामे करून घेण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 2% कन्सल्टन्सी चार्जेसवर नियुक्ती करण्यास मा.आयुक्तांनी शिफारस केली असून स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्याचे आदेशित केलेले आहे.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-7 येथील जुने शॉपींग सेंटर समोर छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारणे संदर्भात सविस्तर नकाशे तयार करणे, महाराष्ट्र शासनाच्या मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांची चबुतऱ्यास/आराखड्यास मान्यता घेणेसाठी नकाशे सादर करणे व प्रस्तुत कामावर देखरेख करण्यासाठी वास्तुविशारद श्री.महेश ल. कुलकर्णी यांची नियुक्ती करून त्यांचे मार्फत उपरोक्त कामे करून घेण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 2% कन्सल्टन्सी चार्जेसवर नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.231 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दि.1-8-2005 पासून औरंगाबाद शहरामध्ये वॉर्ड कार्यालयाची रचना करण्यात आली व त्यानुसार कचरा वाहतुकीची व्यवस्था करण्यात आली. परंतु शहराचा वाढता व्याप व लोकसंख्येमुळे कचरा वाहतुकीसाठीची वाहने कमी पडत असल्यामुळे व संपूर्ण कचरा उचलणे जरूरी असल्यामुळे मा.महापौर, मा.आयुक्त, मा.पदाधिकारी यांचे पाहणीनुसार वॉर्ड-ड मध्ये तीन व वॉर्ड-फ मध्ये दोन वाहने कचरा वाहतुकीसाठी कार्यरत करणे आवश्यक असल्यामुळे मा.आयुक्तांचे मंजुरीनुसार आरटीओ दराप्रमाणे भाडे दर रू.1940/- आठ तासाकरीता व जास्तीच्या प्रति तासासाठी रू.242/- प्रमाणे मे.राजेंद्रसिंग, औरंगाबाद, कंत्राटदार यांचे मार्फत लावण्यात आली. तसेच वॉर्ड-क मध्ये कार्यरत कचरा वाहतुकीचे वाहन क्र.एमएच-20/ए-6216 यास दि.30-11-2006 रोजी अज्ञात जमावाने नारेगांव येथे आग लावल्यामुळे सदरील वाहन अंशतः जळाले आहे. याबाबत दुरूस्तीसाठी प्रशासकीय कार्यवाही चालु आहे. परंतु सदरील वाहन दुरूस्त होईपर्यंत कचरा उचलण्यासाठी या वाहनाऐवजी वरील प्रमाणेच्या मंजूर दराने एक टिप्पर किरायाने लावणे जरूरी आहे.

करीता वरील प्रमाणेच्या दरास व वॉर्ड-फ, वॉर्ड-ड मध्ये किरायाने लावलेली वाहने कार्यरत ठेवण्यास तसेच वॉर्ड-क मध्ये एक टिप्पर किरायाने लावण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मो.जवेद : वार्ड क मध्ये सफाईच्या कामासाठी डांबरासाठी वापरात येणारी गाडी उपयोगात आणली जते. ही गाडी ९ नंतर सफाईच्या कामासाठी उपलब्ध राहत नाही तेव्हा प्रस्तुत प्रस्तावानुसार १ गाडी वार्ड क साठी देण्यात यावी.

मा.सभापती : प्रस्तुत प्रस्तावानुसार गाड्यांचे दर निश्‍चित करण्यासाठी हा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे दर निश्‍चित झाल्यानंतर किती गाड्या घेतल्या जतील आणि त्या कोणत्या वार्डाला द्यायच्या याचा विचार केला जईल.

श्री.मुजीब खान : प्रस्तुत प्रस्तावानुसार एका दिवसासाठी रू.१९४०/- देण्यात येणार आहेत या दराप्रमाणे एक वर्षाचा खर्च किती होणार आहे. याचा विचार करता नवीन गाड्या आपण घेऊ शकत नाही का, आपल्याकडे राखीव वाहन चालक नाहीत का याबाबत खुलासा व्हावा.

मा.सभापती : अतिरीक्त शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : वाहतुकीच्या कामाच्या खाजगीकरणाची सुरूवात झालेली आहे. अशा परिस्थीतीत नवीन वाहन खरेदी करणे आणि त्यासाठी वाहन चालकाची भरती करणे, सध्या महानगरपालिकेकडे अतिरीक्त चालक नाहीत.

श्री.रविकांत गवळी : प्रस्तुत प्रस्तावानुसार मे.राजेंद्र कॉन्ट्रॅक्टर यांच्या मार्फत वाहन लावण्यात आले आहे असा उल्लेख आहे. जर वाहन लावतांना सभागृहाच्या मंजुरी घेण्यात आली नाही. तर मुदतवाढ करीता सभागृहाच्या मंजुरीची आवश्यकता काय याचा खुलासा व्हावा.

मा.सभापती : अतिरीक्त शहर अभियंता यांनी याबाबत खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : वार्ड ऑफसची पुर्नरचना करीत असताना उपलब्ध असलेल्या वाहनांची रिचॅप्लींग करण्यात आली. त्यावेळी वार्ड **ड** आणि **फ** करीता वाहने कमी पडली त्यानुसार या वार्डाकरीता खाजगी वाहने उपलब्ध करून द्यावी लागली.

श्री.मुजीब खान : खाजगी वाहन उपलब्ध करून देण्यासाठी कोणाची मान्यता घेण्यात आली आहे.

श्री.रविकांत गवळी : प्रस्तुत प्रस्तावानुसार वार्ड **ड** करीता ३ आणि **फ** करीता २ अशा एकुण ५ गाड्या आहेत. आणि त्यांना ८ तासाकरीता २०००/- रू.आणि वाढीव २ तासाकरीता प्रत्येकी ५००/-रू. याप्रमाणे एका गाडीकरीता दररोज २३००/२४०० रू. रोज देण्यात येणार आहे. त्यासाठी मान्यता घेण्यात आलेली आहे याचा खुलासा आत्ताच सभागृहात करण्यात आला आहे. तर मग प्रस्ताव सभागृहापुढे का ठेवण्यात आला.

मा.सभापती : अतिरीक्त शहर अभियंता यांनी सविस्तर खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : मंजुरी घेऊनच दर निश्‍चित केलेले आहे. आणि हे दर निश्‍चित करण्यासाठी सभागृहापुढे प्रस्ताव आलेला आहे. हे दर आर.टी.ओ.चे आहेत. त्या दराच्या मंजुरीसाठीच स्थायी समितीकडे आलो आहोत.

श्री.मुजीब खान : महानगरपालिकेकडे किती वाहने आहेत किती वाहन चालक आहेत याची माहिती देण्यात यावी.

श्री.त्र्यंबक तुपे : वार्ड **क** चा एक ट्रक नारेगांव येथे अज्ञात इसमांनी जळला, ह्या ट्रकला आग लागुन किती दिवस झाले, या आगीत ट्रकचा कोणता भाग जळाला तो ट्रक दुरूस्त व्हायला किती वेळ लागणार आहे. तो ट्रक दुरूस्त होत नसेल तर यांत्रिकी विभाग काय करतो याचाही खुलासा होणे आवश्यक आहे.

अति.शहर अभियंता : जळालेला ट्रक दुरूस्त होऊ शकत नाही आणि दुरूस्त करावयाचा झाल्यास त्यासाठी अंदाजे ७०/८० हजर रू.खर्च येईल. या ट्रकच्या विम्यातुन फक्त २५/३० हजर रूपये मिळणार आहेत.

मा.सभापती : प्रस्तुत प्रस्तावाशी संबंधीत सविस्तर माहिती तसेच वाहन चालक, वाहनांची संख्या यासंबंधीची माहिती पुढील सभेत ठेवण्यात यावी. जेपर्यंत प्रस्तावाला मंजुरी मिळत नाही तोपर्यंत देयक अदा करण्यात येऊ नये.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाशी संबंधीत सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.232 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.55 कैसर कॉलनी अंतर्गत रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.10,00,000/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असून या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता दोन निविदापत्रके विक्री झाली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन्ही निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

1. मे. ए.एस. कन्स्ट्रक्शन — अं.प.दरापेक्षा 26.27% जास्त दराने
2. आदिनाथ कन्स्ट्रक्शन — अं.प.दरापेक्षा 30.08% जास्त दराने

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी श्री.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 26.27% ने जास्त आहेत. डांबर खरेदीचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता 13.10% जास्त दर येत आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी श्री.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 13.10% जास्त दराने करून घेण्याबाबत प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.55 कैसर कॉलनी अंतर्गत रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 13.10% जास्त दराची श्री. ए. एस. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.233 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वेदांतनगर अंतर्गत रस्त्यालगत फुटपाथ बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.19,63,000/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानुसार सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता 28 निविदापत्रके विकली गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 4 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

1. आदिनाथ कन्स्ट्रक्शन — अं.प.दरापेक्षा 1.5% जास्त दराने
2. श्री.शेख मोहम्मद इब्राहीम — अं.प.दरापेक्षा 5% जास्त दराने
3. मेसर्स असेंड कन्स्ट्रक्शन — अं.प.दरापेक्षा 15% जास्त दराने
4. श्री. शेलार किशोर — बंद निविदा

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 1.5% जास्त आहेत. सदर गुत्तेदारास समक्ष वाटाघाटीस बोलाविले असता सिमेंटचे दरात

झालेली वाढ लक्षात घेता 3% कमी दराने काम करण्यास सदर गुत्तेदाराने संमती दर्शविलेली आहे. त्यास मा.आयुक्तांनी स्थायी समितीसमोर सादर करण्यासाठी शिफारस केलेली आहे.

तरी मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 3% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मो.जवेद इसाक : प्रस्तुत कामासाठी २८ निविदा विकण्यात आल्या होत्या त्यापैकी फक्त ४ निविदा आल्या आहेत. तेव्हा या कामासाठी फेरनिविदा का करण्यात आली नाही.

मा. सभापती : प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वेदांतनगर अंतर्गत रस्त्यालगत फुटपाथ बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा 3% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.234 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, चाणक्यपुरी रस्ता ते शंभुनगर या 50 फुट रूंद विकास योजना रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.14,99,700/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाल्यानुसार सदर कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता 19 निविदापत्रके विक्री झाली. त्यापैकी निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 4 निविदापत्रके प्राप्त झाली. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 1. महेश राजपूत | अं.प.दरापेक्षा 22.11% कमी दराने |
| 2. ललित डी. अधाने | अं.प.दरापेक्षा 21% कमी दराने |
| 3. खंडेलवाल कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 17.25% कमी दराने |
| 4. राजेंद्रसिंग अजितसिंग | अं.प.दरापेक्षा 11% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी श्री.महेश राजपूत यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22.11% कमी आहेत. तरी सदर काम श्री. महेश राजपूत यांचेकडून अं.प.दरापेक्षा 22.11% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : प्रस्ताव कृ.२३४ व २३५ च्या बाबतीत असे दिसते की, प्रस्तुत कामासाठी अनुक्रमे २२.११% व ३१% कमी दराची निविदा प्राप्त आहे. या दराने कामाचा दर्ज राखला जाणार आहे का?

मा. सभापती : कामचा दर्ज चांगला राहिल याची संबंधीत विभागाने दक्षता घ्यावी. प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चाणक्यपुरी रस्ता ते शंभुनगर या 50 फुट रूंद विकास योजना रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 22.11% कमी दराची श्री.महेश राजपूत यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. कामाचा दर्जा चांगला राहिल याची दक्षता प्रशासनाने घ्यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.235 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वॉर्ड क्र.9 नंदनवन कॉलनी येथे 15 मी. रूंद रस्त्यावर फुटपाथ बांधणेच्या कामासाठी तयार करण्यातआलेल्या र.रू.12,80,000/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाल्यानुसार सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता 22 निविदापत्रके विकी झाली. त्यापैकी स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 5 निविदापत्रके प्राप्त झाली. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 1. श्री. अरूण इंगळे | अं.प.दरापेक्षा 31% कमी दराने |
| 2. मे. अमन असोसिएटस् | अं.प.दरापेक्षा 21.786% कमी दराने |
| 3.श्री. पी.एस. जाजू | अं.प.दरापेक्षा 19.999% कमी दराने |
| 4. एस. एन. इब्राहीम | अं.प.दरापेक्षा 18.18% कमी दराने |
| 5. हेमंत गंगवाल | अं.प.दरापेक्षा 15% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री.अरूण इंगळे यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 31% ने कमी आहेत. सदर दरास मा.आयुक्तंनी शिफारस करून स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशित केलेले आहे.

तरी श्री.अरूण इंगळे यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 31% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

मा. सभापती : कामचा दर्ज चांगला राहिल याची संबंधीत विभागाने दक्षता घ्यावी. प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.9 नंदनवन कॉलनी येथे 15 मी. रूंद रस्त्यावर फुटपाथ बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 31% कमी दराची श्री. अरूण इंगळे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. कामाचा दर्जा चांगला राहिल याची दक्षता प्रशासनाने घ्यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.236 :**

कार्यकारी अभियंता(ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.19 शिवनेरी कॉलनी, सिडको येथे सभागृह बांधणे करीता सा.बां. विभागाच्या सन 2005-2006 च्या जिल्हा दरसुचीनुसार र.रू.14,57,450/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास दि.22.9.2006 च्या बैठकीत ठराव क्र.117 अन्वये स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानुसार सदर कामासाठी निविदा सूचना क्र.मनपा/इ-निविदा/50/2006 दि.17.10.2006 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 15 निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकूण 5 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि.21.11.2006 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| 1. एस. ए. नवाब | अं.प.दरापेक्षा 4.30% जास्त दराने |
| 2. रत्नगुरू कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 8% जास्त दराने |
| 3. लक्ष्मीनारायण कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 10% जास्त दराने |
| 4. यारखान अमजेद जमील | अं.प.दरापेक्षा 20% जास्त दराने |
| 5. स. मजीउद्यीन चिस्ती | निविदेसोबत देण्यात आलेली इसारा रक्कम कमी असल्याने निविदा उघडण्यात आली नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.30% जास्त दराची निविदा श्री.एस.ए.नवाब यांची प्राप्त झालेली आहे. मा.आयुक्तांचे दालनात झालेल्या दराबाबतच्या वाटाघाटीअंती

4.30% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने सदरील निविदा मान्यतेस्तव स्थायी समितीकडे सादर करणेबाबत मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सदरील कामासाठी श्री.एस.ए.नवाब यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ाॅर्ड क्र.19 शिवनेरी कॉलनी, सिडको येथे सभागृह बांधणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम श्री.एस.ए.नवाब यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.237 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.93 रचनाकार कॉलनी स्टेशन रोड येथे मनपाच्या खुल्या जागेत बहुउद्देशीय हॉल बांधणे व परिसर विकसीत करणेच्या कामासाठी सा.बां.विभागाच्या सन 2005-06 च्या जिल्हा दरसुचीनुसार र.रू.14,81,000/- चे अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यानुसार सदरील कामासाठी निविदा सूचना क्र.मनपा/इ-निविदा/53/2006 दि.1.11.2006 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 19 निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकुण 4 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि.24.11.2006 रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| 1. ऋषिकेश कन्स्ट्रक्शन | 12.50% जास्त दराने |
| 2. एस. एम. इब्राहीम | 18.86% जास्त दराने |
| 3. शे. महंमद अझहर | 22.90% जास्त दराने |
| 4. स. मजीउद्यीन चिस्ती | 27% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा 12.50% जास्त दराची निविदा ऋषिकेश कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. मा.आयुक्तांच्या दालनात झालेल्या दराबाबतच्या वाटाघाटी अंती अं.प.दरापेक्षा 12.50% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2% जास्त दराची निविदा मान्यतेस्तव स्थायी समितीकडे सादर करणेबाबत मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार ऋषिकेश कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 2% जास्त दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.93 रचनाकार कॉलनी स्टेशन रोड येथे मनपाच्या खुल्या जागेत बहुउद्देशीय हॉल बांधणे व परिसर विकसीत करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम ऋषिकेश कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा 2% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.238 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेने विकसित केलेल्या विविध पर्यटन वास्तुंची यथोचित प्रसिध्दी व्हावी, याकरिता काही निवडक छायाचित्रांची भेटकार्डे तयार करून घेण्यात आली आहेत. ही भेटकार्डे मनपाच्या सिध्दार्थ उद्यान, प्राणी संग्रहालय, शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय, डॉ.आंबेडकर संशोधन केंद्र, भारतमाता मंदिर व मनपा मुख्य कार्यालय या ठिकाणी विक्रीस्तव उपलब्ध करून द्यावयाची आहेत. एकूण 15 भेटकार्डांच्या संचाची विक्री किंमत रू.60/- व एका कार्डाची विक्रीची किंमत रू.5/- अशी प्रस्तावित करण्यात येत आहे. करीता सदरील दरास मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेने विकसित केलेल्या विविध पर्यटन वास्तुंची यथोचित प्रसिध्दी व्हावी, याकरिता तयार केलेल्या निवडक छायाचित्रांच्या 15 भेटकार्डांच्या संचाची विक्री किंमत रू.60/- व एका कार्डाची विक्रीची किंमत रू.5/- असे दर निश्चित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.239 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की, वित्तीय वर्ष सन 2007-2008 या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांवरील मालमत्ता कराचे दर हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 9 व कलम 99 अन्वये महानगरपालिकेने दि.20.2.2007 रोजी किंवा त्यापुर्वी निश्चित करणे व मंजुर करणे आवश्यक आहे.

त्याप्रमाणे सन 2007-2008 या वित्तीय वर्षासाठी खालील प्रमाणे दर प्रस्तावित आहेत. जे की सन 2006-07 या वर्षा करीता सुध्दा निश्चित करण्यात आले होते. तेच दर सन 2007-2008 या वित्तीय वर्षासाठी अंमलात राहील, जे की खालील प्रमाणे आहे.

**1 ) महापालिकेचे दर -**

| अ.क्र | कराचे नांव | करयोग्य मुल्य | प्रचलित दर सन **2006-2007** | **प्रस्तावित दर सन 2007-2008** |
|---|---|---|---|---|
| 1 | सामान्य कर | 1) निवासी वापराच्या सर्व करयोग्य मुल्यावर | 30% | 30% |
| | | 2) बिगर निवासी वापराच्या सर्व करयोग्य मुल्यावर | 45% | 45% |
| | | 3) औद्योगिक क्षेत्रामधील औद्योगिक वापरासाठी असलेल्या मालमतांवरील करयोग्य मुल्यावर | 36% | 36% |
| 2 | साफसफाई कर | 1) निवासी | 3% | 3% |
| | | 2) निवासेत्तर कोणत्याही करयोग्य मुल्यावर | 10% | 10% |
| 3 | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | 1% | 1% |
| 4 | अग्निशमन कर | | 1.5% | 1.5% |
| 5 | मनपा शिक्षण कर | | 2% | 2% |
| 6 | पथकर | | 2% | 2% |
| 7 | जललाभ कर | | 1.5% | 1.5% |
| 8 | जलनि:सारण कर | | 1.5% | 1.5% |

2) तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठ्या निवासी क्षेत्रावरील कर हे शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करयोग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

1) मोकळ्या जागेवरील कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येईल.

करीता वरील प्रमाणेदर निश्चित करून अंमलबजावणी दिनांक 1-4-2007 पासून करण्याचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

सौ.लता दलाल : मालमत्ता कराचे दर हे मागील वर्षा प्रमाणेच असले तरी हे दर आपण प्रकाशित केले आहेत का दुसरा प्रश्न असा की गेल्या ३ वर्षातील पेपर हे प्रसिध्द झाले आहेत का त्याच्या प्रती स्थायी समितीच्या सदस्यांना देणे आवश्यक आहे. प्रशासनाच्या आर्थिक व्यवहारा बाबतची माहिती या सभागृहाला देणे आवश्यक आहे. याबाबतचे समरी रजिष्टर तयार केले आहे का ते कुठे आहे.

मा.आयुक्त : या प्रस्तावात एक मोठा बदल आहे. इतर महानगरपालिकेमध्ये निवासी मालमत्ता आणि औद्योगिक क्षेत्राच्या मालमत्तांकरीता वेगळा कर लावण्याची पध्दत आहे ती पध्दत आपण अवलंबत न होतो. इतर महानगरपालिकेप्रमाणे या प्रस्तावात निवासी मालमत्ता आणि औद्योगीक क्षेत्राच्या मालमत्ता याकरीता वेगवेगळे कर लावण्यात आले आहे.

सौ.लता दलाल : या ठिकाणी मालमत्ता कराबरोबर जे वेगवेगळे कर लावलेले आहे त्यापैकी किती कर आपण शासनाकडे जमा करतो त्या मोबदल्यात शासनाकडून आपणास काही अनुदान मिळते का ही सगळी माहिती सभागृहा पुढे येणे आवश्यक आहे.

मा.सभापती : करमुल्य निर्धारक यांनी याबाबत खुलासा करावा.

कर निर्धा. व संकलक : दरवर्षी साधारण २० फेब्रुवारीच्या आत मालमत्ता कराबाबत सर्वसाधारण सभेची मान्यता घेतो. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर वृत्तपत्रात प्रसिध्दी देण्यात येते. मालमत्ता कराबरोबर शासनाचे जे कर वसुल होतात त्यामध्ये रोजगार हमी योजना कर, शिक्षण कर, मोठ्या निवासाचे कर हे शासनाला जमा होतात.

सौ.लता दलाल : रोजगार हमी कर,शिक्षण कर,आणि मोठ्या निवासावरील कर हे तिन्ही कर मिळून शासनाला किती रक्कम जते आणि त्यावर महानगरपालिकेला किती टक्के रक्कम मिळते.

मा.आयुक्त : या तिन्ही कराबाबत कलेक्शन चार्जेस शासनाकडून मिळतात.

मा.सभापती : मा.उप महापौर यांनी जी मागील ३ वर्षाची माहिती मागविली आहे ती पुढील बैठकीत करमुल्य निर्धारण अधिकारी यांनी द्यावी. या विषयाला मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांवरील सन 2007-2008 या वित्तीय वर्षासाठी खालील प्रमाणे दर निश्चित करण्यास तसेच दि.1-4-2007 पासून त्याची अंमलबजावणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## 1 ) महापालिकेचे दर -

| अ.क्र | कराचे नांव | करयोग्य मुल्य | प्रचलित दर व प्रस्तावित दर | स्थायी समितीने मंजूर केलेले दर सन २००७-२००८ |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १) निवासी वापराच्या सर्व करयोग्य मुल्यावर | ३०% | ३०% |
| | | २) बिगर निवासी वापराच्या सर्व करयोग्य मुल्यावर | ४५% | ४५% |
| | | ३) औद्योगिक क्षेत्रामधील औद्योगिक वापरासाठी असलेल्या मालमतांवरील करयोग्य मुल्यावर | ३६% | ३६% |
| २ | साफसफाई कर | १) निवासी | ३% | ३% |
| | | २) निवासेत्तर कोणत्याही करयोग्य मुल्यावर | १०% | १०% |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १% | १% |
| ४ | अग्निशमन कर | | १.५% | १.५% |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २% | २% |
| ६ | पथकर | | २% | २% |
| ७ | जललाभ कर | | १.५% | १.५% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | जलनि:सारण कर | | १.५% | १.५% |

2) तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठ्या निवासी क्षेत्रावरील कर हे शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करयोग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

3) मोकळ्या जागेवरील कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येईल.

वरीलप्रमाणे प्रस्तावास मंजुरी देवून सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.240 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.72 अंतर्गत मुख्य काँक्रीट पाथवे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.11,98,460/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाल्यानुसार सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता 6 निविदापत्रके प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | |
|---|---|
| 1. एस. एस. मोटेगांवकर | 1.73% जास्त दराने |
| 2. हरीओम कन्स्ट्रक्शन | 3% जास्त दराने |
| 3. रत्नगुरू कन्स्ट्रक्शन | 4% जास्त दराने |
| 4. एस. एम. इब्राहीम | 5% जास्त दराने |
| 5. व्यंकटेश शिरवंत | 6.66% जास्त दराने |
| 6. जयलक्ष्मी कन्स्ट्रक्शन | 8% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी श्री. एस. एस. मोटेगांवकर यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 1.73% जास्त आहेत. सध्या दरसुची मध्ये अंतर्भूत सिमेंटचे दर व प्रत्यक्ष बाजार भाव दर यात दुप्पटीने वाढ झालेली आहे.

तरी श्री.एस.एस. मोटेगांवकर यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.73% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.72 अंतर्गत मुख्य काँक्रीट पाथवे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 1.73% जास्त दराची श्री. एस.एस. मोटेगांवकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.241 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, दिनांक 1/3/2007 ते 29/2/2008 या कलावधीसाठी औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत आयात होणाऱ्या मालावरील जकात कर खाजगी अभिकत्यामार्फत वसुल करण्यासाठी दिनांक 30/12/2006 रोजीच्या वर्तमानपत्रात टेंडर नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती. दिनांक 16/1/2007 पर्यंत एकूण पाच निविदांची विक्री झाली होती. त्यानुसार प्राप्त निविदा दिनांक 22/1/2007 रोजी दुपारी 3.00 वाजता उघडण्यात आल्या. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

1) श्री. सुनिल मंत्री
2) मेगा इंटरप्रायजेस
3) मे. साई इंटरप्रायजेस
4) मे. सहकार एजन्सीज प्रा.लि.
5) मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर

वरील निविदा धारक अनुक्रमे 1) श्री.सुनिल मंत्री, 2) मेगा इंटरप्रायजेस व 3) मे.साई इंटरप्रायजेस यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार एकूण देकार रक्कमेच्या 50% जकात वसुली करण्याचे अनुभव प्रमाणपत्र सादर केले नसल्याने संबंधित तीनही निविदा धारकांस अपात्र ठरविण्यात आले.

निविदेतील अटी व शर्तीनुसार पुर्तता करणारे 1) मे.सहकार एजन्सीज् प्रा.लि., 2) मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर या दोनही एजन्सीचा कमर्शियल ऑफर असलेला लिफाफा क्र.2 उघडण्यात आला असता, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | देकाराची रक्कम रूपये |
|---|---|---|
| 01 | मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. | 110,07,00,000/- |
| 02 | मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर | 109,08,00,000/- |

वरील मे.सहकार एजन्सीज प्रा.लि. मुंबई यांनी सर्वात जास्त म्हणजेच रक्कम रू.110,07,00,000/- चा देकार दिला असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले. वाटाघाटी अंती मे.सहकार एजन्सीज प्रा.लि. यांनी देकाराची रक्कम वाढवून देण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे सर्व निविदा रद्द करून पुन्हा नव्याने फेर निविदा मागविण्याचा निर्णय घेण्यात आला.

तथापी फेर निविदा दिनांक 22/1/2007 रोजी काढण्यात येऊन फेर निविदा विक्रीची मुदत दिनांक 30/1/2007 पर्यंत ठेवण्यात आलेली होती. सदर कालावधीमध्ये एकूण पाच निविदांची विक्री झाली होती. त्यानुसार प्राप्त निविदा दिनांक 31/1/2007 रोजी दुपारी 3.00 वाजता उघडण्यात आल्या. त्याचा तपशील पुढील प्रमाणे.

1) मे. सहकार एजन्सीज प्रा.लि.
2) मे. कोणार्क इंन्फ्रास्ट्रक्चर
3) श्री. सुनिल मंत्री
4) मेगा इंटरप्रायजेस
5) मे. मेघना इंटरप्रायजेस

वरील प्रमाणे प्राप्त निविदा धारकाचे निविदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची प्रथम तपासणी करण्यात आली असता, 1) श्री.सुनिल मंत्री, 2) मेगा इंटरप्रायजेस, 3) मे.मेघना इंटरप्रायजेस यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार एकूण देकार रक्कमेच्या 50% जकात वसुलीचे अनुभव प्रमाणपत्र सादर केले नसल्याने संबंधित तीनही निविदा धारकांस अपात्र ठरविण्यात आले.

उर्वरीत दोन निविदा धारकांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार 1) मे.सहकार एजन्सीज् प्रा.लि., 2) मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर या दोनही एजन्सीने आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यामुळे सदर एजन्सीजचे कमर्शियल ऑफर असलेला लिफाफा क्र.2 उघडण्यात आला असता, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | देकाराची रक्कम रूपये |
|---|---|---|
| 01 | मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. | 110,43,00,000/- |
| 02 | मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर | 110,25,00,000/- |

प्राप्त निविदापैकी सर्वात अधिक निविदा देकार असलेले मे. सहकार एजन्सीज प्रा.लि., मुंबई यांनी सर्वात जास्त म्हणजेच 110.43 कोटी चा देकार दिलेला होता. त्यामुळे प्राप्त देकाराच्या अनुषंगाने संबंधीत एजन्सी धारका सोबत दर वाढविणे करीता वाटाघाटी करण्यात आल्या. झालेल्या वाटाघाटी अंती मे.सहकार एजन्सीज प्रा.लि., मुंबई यांनी रूपये 111,06,00,000/- (अक्षरी रूपये एकशे अकरा कोटी सहा लक्ष फक्त) लेखी संमतीचा देकार दिलेला असल्याने व निविदा सूचनेतील अटी शर्तीनुसार संबंधित निविदा धारकाने संपूर्ण कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे व तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या

अनुसूची-ड मधील प्रकरण 8 चे नियम 35 मधील तरतुदीच्या अधिन राहून दिनांक 1/3/2007 ते 29/2/2008 या कालावधीसाठी मे.सहकार एजन्सीज प्रा.लि., मुंबई यांना जकात कर वसुली करण्यासाठी **“खाजगी अभिकर्ता”** म्हणून नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.मुजेब खान : जकात खाजगी करणाकरीता प्रस्तुत प्रस्तावानुसार ५ निविदा प्राप्त झाल्या होत्या त्यापैकी ३ निविदामध्ये कागदपत्र नव्हते. या ३ निविदामध्ये कोणते कागदपत्र नव्हते की, ज्यामुळे त्यांची निविदा उघडण्यात आली नाही याचा खुलासा व्हावा.

मा.सभापती : उपायुक्त महसुल यांनी याबाबत खुलासा करावा.

उप आयुक्त (म.) : १ मार्च २००७ ते २९ फेब्रुवारी २००८ या वर्षासाठी जकातीचे संकलन खाजगी अभिकर्त्यामार्फत करण्यासाठीची निविदा दिनांक ३० डिसेंबर २००६ रोजी मागविण्यात आलेल्या होत्या या निविदेत जे ठेकेदार किंवा अभिकर्ता जकात गोळा करणार आहे, त्याला महानगरपालिकेचे जे अंदाजपत्रकीय रक्कम रू.१०९ कोटी याच्या ५०% जकात संकलनाचा अनुभव असावा, अशी अट टाकण्यात आलेली होती. दिनांक २२ जनेवारी २००७ आणि ३१ जनेवारी २००७ या वेळेस ज्या निविदा उघडल्या गेल्या त्यामध्ये जे ३ निविदा धारक आहेत त्यामध्ये मे.साई इंटरप्राईजेस, श्री.सुनिल मंत्री आणि मेघा इंटरप्राईजेस आणि दुसऱ्या टप्प्यामध्ये मेगा इंटरप्राईजेस, श्री.सुनिल मंत्री आणि मे.मेघना इंटरप्राईजेस या तिन्ही निविदाधारकाकडे जे इलीजेबीलीटी कंडीशन किमान ५०% जकात संकलनाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र नसल्यामुळे त्यांची दुसरी ऑफर असलेले बंद पाकीट उघडण्यात आले नव्हते.

श्री.मुजेब खान : जकात संकलनाच्या मागील वर्षीच्या निविदामध्ये ५०% जकात संकलनाच्या अनुभवाची अट नव्हती. परंतु यावर्षीच्या जकात निविदेमध्ये ही अट प्रशासनाने आपल्या मर्जीने टाकली आहे. तेव्हा जकात निवेदेमध्ये अट टाकण्यापुर्वी त्या बाबतची मंजुरी स्थायी समितीकडून घेणे आवश्यक होते तशी मंजुरी घेण्यात आली नाही. मागील वर्षी जकात संकलनाबाबत मागविलेल्या निविदेचे पुस्तक माझ्याकडे आहे. त्यात अशा प्रकारची कोणतीही अट नव्हती. प्रशासनाने आपल्या मर्जीने या वर्षीची निविदा तयार केली आहे.

मा.सभापती : उप आयुक्त (म.) यांनी याबाबत खुलासा करावा.

उप.आयुक्त (म.) : सन २००६-२००७ या वर्षाचे जकातीचे संकलन खाजगी अभिकर्त्या मार्फत करतांना ही इलीजेबीलीटी च्या कंडीशनची जे अट आहे ती त्या निवेदेमध्ये नव्हती. गेल्या वर्षाची निविदा उघडतांना यावर चर्चा झाली होती. त्यात २००७-२००८ या वर्षाचे जकातीचे संकलन करतांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ परिशिष्ठ ‘ड’ चे प्रकरण ५ मधील नियम २(२) नुसार जे अभिकर्ता नेमावयाचा आहे किंवा जे कॉन्ट्रॅक्ट द्यावयाचे आहे. ते कॉन्ट्रॅक्ट महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने असावे या संबंधी ज्या अटी टाकणे आवश्यक आहे त्या अटी असाव्यात आणि त्या संबंधित ठेकेदाराकडून व्यवस्थित वसुली व्हावी.त्याला जकातीच्या संकलनाचा अनुभव असावा. या उद्देशाने २००७-२००८ या वर्षासाठी ही अट टाकण्यात आली होती.

श्री.मुजेब खान : निविदेमध्ये जे अट टाकण्यात आली आहे ती अट टाकण्यापुर्वी स्थायी समिती समोर मंजुरीसाठी येणे आवश्यक होते तशी स्थायी समितीची मंजुरी प्रशासनाने घेतली आहे का. प्रशासनाने आपल्या मर्जीने ही अट टाकलेली आहे.

मा.सभापती : निविदेमध्ये जी अट टाकण्यात आली आहे. त्यासाठी स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता होती काय, असल्यास आपण का घेतली नाही याचा खुलासा करावा.

मा.आयुक्त : जकात अभिकर्ता नेमण्याचा जे विषय सभागृहापुढे आला तो अंतीम मंजुरीसाठी सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे. अंतीम मंजुरी देतांना प्रशासनाने जे कार्यवाही केली आहे. ते समजुन या विषयाला सभागृहाने मान्यता द्यावी. ही अट टाकतांना प्रशासनाला असे वाटले की जकातीची वसुली करतांना त्या अभिकर्त्याला ५०% जकात वसुलीचा अनुभव असावा. असे वाटले म्हणून ही अट टाकली आहे.

श्री.मुजेब खान : जकात संकलनाबाबत ज्या निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी ३ निविदा धारकाकडे ५०%जकात वसुलीचा अनुभव नसल्यामुळे त्यांच्या निविदा उघडल्या नाहीत. हे निविदा धारक वारंवार ५०% जकात वसुलीचे प्रमाणपत्र आणुन देतो असे सांगत असतानाही प्रशासनाने ते ऐकले नाही. ५०% जकात वसुलीच्या अनुभवाचे प्रमाणपत्र ही अट प्रशासनाने आपल्या मर्जीने नव्याने टाकली आहे. ही अट टाकण्यास स्थायी समितीने मंजुरी दिलेली नाही त्यासाठी स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

मा.आयुक्त : प्रशासनाला महानगरपालिकेच्या हितासाठी जे काही अट टाकणे योग्य वाटले ती टाकली.

श्री.मुजेब खान : स्थायी समितीचे अधिकार प्रशासन स्वत: वापरून घेत आहे. हे चुकीचे आहे. या मुद्याबाबत काही लोक न्यायालयात गेले आहेत.

मा.आयुक्त : याबाबत २ गोष्टींचा खुलासा करू इच्छितो की प्रशासन स्थायी समितीचे कोणतेही अधिकार वापरत नाही. निविदे बाबत जे प्रकिया करण्यात आली आहे ती महानगरपालिकेचे हित समोर ठेऊन केली आहे. आणि अंतीम निर्णयासाठी प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे. सभागृह निर्णय घेण्यास सक्षम आहे.

श्री.मुजेब खान : जकात संकलनाबाबत पाचही निविदा घेऊन सभागृहापुढे ठेवण्यात आल्या असत्या आणि त्यात या तीन निविदा धारकाकडे अटीनुसार ५०% जकात संकलनाचे प्रमाणपत्र नाही. असा प्रस्ताव सभागृहापुढे येणे आवश्यक होते पण तशी कार्यवाही न करता प्रशासनाने त्यांच्या निविदा उघडलेल्या नाहीत. त्याऐवजी प्रशासनाने पाचही निविदा सभागृहापुढे ठेवल्या असत्या तर सभागृह प्रशासनाची बाजु ऐकुन सभागृह त्यावर निर्णय घेऊ शकले असते. त्यामुळे ही प्रक्रिया शंकेच्या भोवऱ्यात येते.

मा.आयुक्त : सभागृह या विषयावर अंतीम निर्णय घेऊ शकते. प्रशासनाने निविदेमध्ये जी अट टाकली होती त्याची पुर्तता होत नव्हती. म्हणून प्रशासनाने निविदा उघडल्या नाहीत.

श्री.मुजेब खान : प्रशासनाने मागील वर्षी ज्या निविदा काढल्या त्यात कोणत्याही प्रकारची अट नव्हती. या वर्षीच्या निविदेत जी अट टाकण्यात आली आहे त्यासाठी स्थायी समितीची मंजुरी घेतेलेली नाही. निविदा उघडताना त्याची सत्यता सभागृहापुढे आणणे आवश्यक होते. ज्या निविदा उघडल्या नाहीत त्यात १२० कोटी व १२१ कोटी ची ऑफर होती अशी बातमी शहरात पसरली आहे. त्यामुळे नगरसेवकांचे नाव बदनाम होत आहे. म्हणून त्या दोन्ही निविदा उघडणे आवश्यक होते. या वर्षीचा जकातीचा ठेका मागील वर्षीच्या

एजन्सीला देण्यात आला आहे या एजन्सीच्या कामाबाबत वारंवार तक्रारी आलेल्या आहेत. त्यात जेष्ठ नागरीकांना त्रास देणे, नागरीकांना बेईज्जत करणे, वाहने सेंट्रल नाका येथे ताटकळत ठेवणे. वाजवीपेक्षा जस्त जकात वसुल करणे इत्यादी बाबत उपआयुक्त यांच्याकडे वेळोवेळी तक्रारी देण्यात आल्या आहेत. त्यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली अशा तक्रारी असतांना सुध्दा पुढील वर्षाचा ठेका देणे करीता त्याच एजन्सीबाबत सहानुभूती का दाखवली जत आहे. तेव्हा हा ठराव पास करू नये अशी माझी विनंती आहे.

मा.सभापती : स.स.श्री.मुजेब आलम शाह यांच्या मुद्याबाबत मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त : स.सदस्य यांनी जे २/३ प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याबाबत पहिली गोष्ट अशी की निवेदेबाबतची प्रक्रिया अजुन संपलेली नाही. त्यास हे सभागृह मान्यता देईल तेव्हाच हे संपेल प्रशासनाने महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने अटी/शर्ती टाकलेल्या आहेत ज्या अटी/शर्ती टाकण्यात आल्या आहेत त्याबाबत मा.उच्च न्यायालयात केस दाखल झाली होती. यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयातही दाखल झाले होते पण सर्वोच्च न्यायालयात प्रकरण खारीजझाले आहे. सभागृहा समोर जे प्रस्ताव आला आहे त्यात दोन निविदा धारकच अटी/शर्तीची पुर्तता करीत होते. म्हणून प्रशासनाने दोन निविदा उघडलेल्या आहेत व उर्वरीत तीन निविदा उघडलेल्या नाहीत.

श्री.मुजेब खान : मा.न्यायालयाने हा अधिकार महानगरपालिकेचा आहे त्या अधिकारानुसार महानगरपालिकेने कार्यवाही केली पाहिजे असा निर्णय दिला आहे. या निर्णयानुसार प्रशासनाची चुक होत आहे. पहिल्या निविदेमध्ये अटी/शर्तीचा उल्लेख नाही. प्रशासनाने त्या निविदा उघडून सभागृहा समोर ठेवायला पाहिजेहोत्या. त्यास सभागृहाने मंजुरी दिली असती किंवा नसती यावरून प्रशासनावर दबाव आल्यामुळे त्याच एजन्सीला काम देण्यात आले आहे.

मा.आयुक्त : प्रशासन कोणत्याही दबावाखाली काम करीत नाही प्रशासनास जे योग्य वाटले ती कार्यवाही पुर्ण करून प्रस्ताव सभागृहापुढे आणण्यात आला आहे. प्रशासनाने जी कार्यपध्दती अवलंबली ती योग्य आहे किंवा नाही ते बघुन सभागृहाने मंजुरी द्यावी.

श्री.मुजेब खान : माझी अशी विनंती आहे की हा प्रस्ताव रद्द करून अटी/शर्तीमध्ये कोणती वाढ करायची याचा विचार करून दुरूस्त प्रस्ताव ठेवण्यात यावा. प्राप्त झालेल्या पाचही निविदांबाबत अन्याय करून चालणार नाही.

मा.आयुक्त : प्रशासनाने पुर्ण अभ्यास करून प्रस्ताव सभागृहापुढे आणलेला आहे. त्यावर सभागृहाने निर्णय घ्यावा.

सौ.लता दलाल : स.सदस्य यांनी कराराबाबत चे जेमुद्दे उपस्थित केले आहे. त्याबाबत संबंधित एजन्सी विरूध्द ज्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत किंवा त्यांच्याकडून पालन झाले नाही. त्यात कराराचे पालन हे झालेच पाहिजे या एजन्सीकडून ज्या चुका झालेल्या आहेत त्याबाबत काय कार्यवाही केली याचा याठिकाणी खुलासा होणे आवश्यक आहे.

मा.आयुक्त : करारात ज्या अटी आहेत त्या संबंधित एजन्सीवर बंधनकारक आहेत. त्यासाठी अटी /शर्तीची यादी त्याच ठिकाणी जकात अधिक्षक यांच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आली आहे. या अटी /शर्तीनुसार नागरीकांच्या ज्या काही तक्रारी असतील तर नागरीकांनी सरळ प्रशासनाकडे दाद मागावी. जी काही वैयक्तीक प्रकरणे असतात त्यासाठी आपले

एक स्कॉड त्याठिकाणी ठेवण्यात आलेले आहे. संबंधित एजन्सीबाबत ज्या तक्रारी आल्या त्याकडे प्रशासनाने लक्ष दिले आहे व त्यानुसार थोड्या दुरूस्त्याही करण्यात आलेल्या आहेत. आपण जी तक्रार दिली त्यात एजन्सीची १००% चुक होती असे नाही. त्या व्यक्तीची थोडी चुक होती.

श्री.मुजेब खान : मी जी तक्रार दिली त्यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली, तक्रार दिल्यानंतरही वाहन महिनाभर गोडाऊनला पडून होते.त्याबाबत अजुन कार्यवाही का झाली नाही. करारानुसार असे वाहन उभे राहिल्यास कडक कार्यवाही केली जईल. ही अट करारात आहे. ती व्यक्ती गणपतीचे दिवस असल्यामुळे पुढे आली होती. त्यावर एजन्सी दोषी असेल तर त्यांच्याकडून पैसे वसुल केले जतील असे आपण सभागृहात सांगितले होते. जकातमध्ये चालू असलेल्या गोंधळाबाबत मी उपायुक्त यांच्याकडे ३/३ वेळा तक्रार दिली आहे. जेथ नागरीकाला नाक्यावर ३/३ घंटे उभे केले जते ही बाब सुध्दा मी प्रशासनाच्या निदर्शनास आणुन दिली आहे. त्यावेळी संबंधित एजन्सीने कर्मचाऱ्याकडून चुक झाली माफ करण्यात यावे असे सांगितले. माझ्याजवळ जेबील आहे त्यात १०% ,२०% जस्त जकात आकारण्यात आली आहे. ही लुटमार कशाकरीता. यात माझ्या २/३ मागण्या आहेत त्यात स्थायी समितीचा अधिकार असतांना त्यास प्रशासनाने मान्यता घेतलेली नाही. या कामाची दुसऱ्यांदा निविदा काढण्यात यावी. ज्या निविदा काढण्यात येतील त्यात नव्या करारानुसार निविदा उघडण्यात याव्या या प्रस्तावाला मंजुरी देऊ नये.

श्री.विनायक पांडे : जकात खाजगी करणाबाबत स.स.श्री.मुजेब आलम शाह यांनी सभागृहा समोर अनेक मुद्दे मांडले आहेत जकातीचे गेल्या १ वर्षापासुन आपण खाजगीकरण केलेले आहे. त्यातुन जवळजवळ २२ कोटीची वाढ झालेली आहे. त्यातुन या शहराचा विकास निश्चितच व्हावा म्हणून कुठल्याही व्यापाऱ्याला किंवा नागरीकांना त्रास होणार नाही याची हमी सहकार एजन्सी देत असेल तर हा प्रस्ताव मंजूर करावा अशी माझी विनंती आहे.

श्री.मो.जवेद कुरेशी : स.स.श्री.मुजेब आलम शाह यांनी सुचविल्या प्रमाणे गेल्या १ वर्षापासुन सहकार एजन्सीचे काम या ठिकाणी चालू असुन या एजन्सीच्या दादागिरीची संपुर्ण शहराला कल्पना आहे. परंतु या वर्षासाठी जे १०९ कोटीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे ते कसे तयार करण्यात आले आहे याची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : या संदर्भात उप आयुक्त (म.) यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त (म.) : स.स.श्री.मो.जवेद कुरैशी यांनी १०९ कोटीचे अंदाजपत्रक कसे तयार केले असा मुद्दा उपस्थित केला आहे. सन २००६-२००७ या वर्षाचे जकातीचे १०१ कोटी २५ लक्ष रूपयाचे उद्दीष्ट होते. सन २००६-२००७ या वर्षात जकातीच्या उद्दीष्टामध्ये इनफ्लेशन आणि इतर बाबीने होणारी वाढ १०% धरून साधारणत: १० कोटी १३ लाख प्रशासनाने गृहीत धरली होती. यानंतर रहदारी फी ५० रूपयाहून १०० रू. करण्याबाबतचा प्रस्ताव प्रस्तावित केला आहे. मागील वर्षामध्ये रहदारी फी मध्ये साधारणत: ४ कोटी ७० लाख एवढे उत्पन्न अपेक्षित आहे. पुढील वर्षात यातून ५ कोटी रूपये येतील असे प्रशासनाने गृहीत धरले आहे. या दोन्ही तिन्ही रकमांचा विचार करता ही रक्कम ११६ कोटी ३८ लक्ष एवढी रक्कम येते. सन २००६-२००७ या वर्षामध्ये जकातीचे संकलन करीत असतांना काही कारखाने यांना जी तूट आली आहे त्यात गरवारे,कन्सेप्ट फार्मा, दारूची गोदमे शहराबाहेर सुरू झाल्यामुळे एकुण तुट रू.७.५० कोटी अपेक्षित आहे. १६ कोटी ३८

लक्ष यातुन ७.५० कोटी तुट वज केल्यानंतर १०८ कोटी ८८ लक्ष या रकमेला राऊंड अप करून १०९ कोटी उत्पन्न गृहीत धरले आहे.

श्री.मुजेब खान : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे गरवारे व इतर कंपन्यांमुळे जकात वसुली कमी झाल्याचे सांगण्यात येते परंतु गरवारे कंपनीच्या मालावर २.७५ दराने जकात आकारण्या ऐवजे रू.१ प्रमाणे जकात आकारण्यात आली. त्याबाबतच्या चौकशीचे काय झाले याचा खुलासा करण्यात यावा. यात हजरो रूपयाचा घोटाळा आहे.

मा.आयुक्त : गरवारे कंपनीच्या मालावर १% दराने जकात आकारण्यात येत होती ती २.७५ दराने आकारावयास हवी होती. याबाबत निवृत्त न्यायाधिश यांचे मत मागविण्यात आले आहे. या प्रकरणी सुनवणी घेण्यात येणार होती परंतु गरवारे कंपनी मालकाच्या नातेवाईकाचे दु:खद निधन झाल्यामुळे ही चौकशी होऊ शकली नाही. गरवारे कंपनीकडून १% दराने आकारण्यात येणारा जकात कर बरोबर असल्याचे मत निवृत्त न्यायाधिश यांच्याकडून प्राप्त झाले आहे. येत्या ८/१० दिवसात हे चौकशीचे काम पुर्ण होईल.

श्री.मुजेब खान : ही सभागृहाची दिशाभूल आहे. गरवारे कंपनीच्या केमिकलवर जकात नियमाप्रमाणे रू.२.७५ या दराने जकात वसुल करणे आवश्यक होते त्याऐवजी १% दराने वसुली करण्यात आली आहे. तर १% दराने आकारण्यात आलेला जकात दर बरोबर असल्याचे मत न्यायाधिश कसे काय देत आहेत. केमिकलसाठी रू.२.७५ हा दर हा महानगरपालिकेने निश्चित केला आहे.

मा.आयुक्त : गेल्या १० वर्षापासुन केमिकलवर १% दराने जकात वसुल केली जत होती परंतु केमिकलवर रू.२.७५ या दराने जकात वसुल करावी. असे सहकार एजन्सीजचे म्हणणे होते. त्यासाठी आकारण्यात येणारा दर योग्य आहे किंवा कसा याबाबत निवृत्त न्यायाधिशांचे मत घेण्यात आले आहे. निवृत्त न्यायाधिशाचे मत आपल्यावर बंधनकारक नसले तरी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकण्यासाठी सुनावणी घेण्यात येईल. त्यावर दोन मुद्दे आहेत यात जर रू.२.७५ दर निश्चित झाला तर मागील काळाचा फरक आपल्याला मिळेल. आणि जर १%दर निश्चित झाला तर वसुल करण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे जकातच्या कॉन्ट्रॅक्ट अमाऊंटवर काही फरक पडणार नाही.

श्री.मुजेब खान : मी सभागृहात पुरावे दाखल केले आहे त्यात जस्त दराने जकात वसुली झाली आहे त्याची चौकशी झाली पाहिजे

मा.सभापती : हा विषय आपण माझ्याकडे दिलेला आहे. यात काय आहे ते पाहण्याचे मा.आयुक्तांना, मी सुचना दिलेल्या आहेत.

मा.आयुक्त : या प्रकरणाची पहिल्यांदा सुनावणी झालेली आहे. यात जे काही निर्णय असेल त्यासाठी प्रत्येक केसवर विचार करावा लागेल. या करारानुसार आपण मला ३ प्रकरणे दाखवली होती. यापैकी एक प्रकरण हे इनव्हेंसिंगचे होते त्यात तोंडी सुनावणी होऊन ते प्रकरण अंतीम करण्यात आले होते.

श्री.मुजेब खान : या प्रकरणात कागदपत्र घेऊन मी आपल्या निवासस्थानी आलो होतो त्याची चौकशी करण्याची मी जी मागणी केली होती त्यावर अजुनही चौकशी झालेली नाही.

मा.आयुक्त : ती जी चौकशी आहे ती कॉन्ट्रॅक्टरच्या आधीच्या कालावधीची आहे . त्याची चौकशी चालू आहे.

श्री.मुजेब खान : चौकशीची मागणी करून दिड/दोन वर्षे होत आली आहेत. तेव्हा ही चौकशी केव्हा पुर्ण होणार. चुकीच्या पध्दतीने होत असलेल्या कामा बाबतची माहिती आपल्या समोर ठेवण्यात आली आहे. यात महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. महानगरपालिकेचे नुकसान होत असलेल्या प्रत्येक बाबी वेळोवेळी निदर्शनास आणुन देण्यात आल्या आहेत पण त्या सर्व बाबींना विलंब लागत आहे. हा ठराव अनधिकृत आहे.

मा.आयुक्त : आपले दोन मुद्दे होते त्यापैकी एक मुद्दा त्याच दिवशी अंतीम करण्यात आला होता. दुसऱ्या मुद्यानुसार २० दिवसापर्यंत वाहन उभे असल्याचा होता यात चौकशी केली असता त्यात त्या मालकाचीच चुक होती असे माझे मत आहे.

श्री.मुजेब खान : गणपतीचे विसर्जन होते त्यावेळी एजन्सीच्या माणसाने गाडी नाक्यावर आणली आणि नाक्यावर आणल्यानंतर आपण त्याची चौकशी करू असे सांगितले होते. नाक्यावर आपले कर्मचाऱ्यांनी फार्मवर सही घेण्याचा प्रयत्न केला पण मी त्यावेळी सही होऊ दिली नाही. फार्मवर सही घेऊन ठेवण्याची प्रशासनाची पध्दत आहे. म्हणजे प्रशासनाची बाजु सुरक्षित ठेवण्याची पध्दत आहे. या प्रकरणात १२ हजर जकात ऐवजे २५/३० हजर रू. घेण्यात आले आहेत.

मा.आयुक्त : शहरातील कोणत्याही नागरीकाला अडचण निर्माण होऊ देणार नाही असे प्रशासनाचे प्रयत्न असतील.

श्री.मो.जवेद कुरेशी : जकात चे उद्दीष्ट १०% ने वाढविण्यात आल्याचा खुलासा सभागृहात करण्यात आला आहे. महानगरपालिकेचे कर्मचारी जकात वसुल करीत असतांना कर्मचाऱ्यांना १५/२०% उद्दीष्ट वाढवून देण्यात येत होते. त्यानुसार आता सुध्दा किमान १७% उद्दीष्ट वाढवून द्यायला पाहिजे होते. आता जे १०%उद्दीष्ट वाढवून देण्यात आले आहे त्यात रू.५०/- प्रमाणे आकारण्यात येणाऱ्या रहदारी फी मध्ये वाढ करून ती १००/-रू करण्यात आल्यामुळे ५ कोटी रूपयाचे उत्पन्न वाढले आहे. तेव्हा १०%उद्दीष्ट कसे काय वाढले.

मा.आयुक्त : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे १०% उद्दीष्ट वाढविल्यानंतर त्यात आणखी ५ कोटीची वाढ केल्यानंतर एकुण ११८ कोटीची जी रक्कम आली त्यात शहराच्या वस्तुस्थिती नुसार जी ७.५० कोटीची जी तुट आहे ती वज केली असता ती अंदाजे १०९ कोटी आली आहे. या १०९ कोटीवर आपण निविदा मागविली आहे. निविदा काढल्यानंतर ते १११.०९ वर गेले आहे.

श्री.मो.जवेद कुरेशी : गरवारे कंपनीचे जकात बंद झाल्याचे सभागृहात सांगण्यात आले आहे. याच बरोबर दारूची जकातही कमी झाल्याचे सांगण्यात आले आहे. यात दारूचे गोदाम शहराबाहेर गेले आहे त्याच बरोबर गरवारे कंपनीचे उत्पादन बंद पडले आहे. म्हणून जकातचे उद्दीष्ट कमी ठेवण्यात आले आहे. पण माहिती घेतली असता गरवारे कंपनी अद्यापही हलविण्यात आली नाही. आजही गरवारेची मशिनरी त्याच जगी कायम आहे. उद्या जर पुन्हा गरवारे कंपनी सुरू झाली तर जे ५/७ कोटी कमी दाखविण्यात आले आहे त्याचे काय? दुसरे असेकी सन २००५-२००६ या वर्षात किती नवीन कारखाने वाढले याची माहिती याची माहिती यात प्रशासनाने दाखविली नाही. ज्या कंपन्या बंद पडल्यात त्याची माहिती सभागृहाला देण्यात आली पण सन २००६-२००७ मध्ये किती नवीन कंपन्या आल्या याची माहिती मात्र देण्यात आली नाही. यातुन हे लक्षात येते की १०९ कोटीचे जे

उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे ते ११७ कोटी असावयास पाहिजेहोते यात मोठ्या प्रमाणात घोटाळा झाल्याचे दिसते.

मा.आयुक्त : २००६-२००७ वर्षासाठी १०१ कोटीचा करार करण्यात आला होता. याच काळात या दोन्ही तिन्ही कंपन्या बंद पडल्या होत्या. एकदा करार झाल्यानंतर त्यात काहीही कमी जस्त होत नसते कंपन्या बंद पडल्यामुळे सहकार एजन्सीने मागील वर्षातच ७.५० कोटी रू.परत करण्याची मागणी केली होती. करार झाला असल्यामुळे ती रक्कम आपण परत केली नाही. या बाबीचा विचार करून या वर्षासाठी १०९ कोटीचे उद्दीष्ट ठरविण्यात आले आहे. त्यावर १११ कोटीची निविदा आली आहे. ही शहराच्या दृष्टीने योग्य रक्कम आहे असे प्रशासनाचे मत आहे. ५०% अनुभवाची जी अट टाकण्यात आली होती ती शहराच्या सुरक्षिततेसाठी टाकली होती. त्यानुसार १११ कोटीची जी निविदा आली आहे त्याबाबत प्रशासन संतुष्ट आहे. अंतीम निर्णय घेणे ही सभागृहाच्या अधिकारातील बाब आहे.

श्री.दिलीप गायकवाड: एजन्सी कोणती आहे याला महत्व नाही पण जेएजन्सी दादागिरी करेल त्यांच्यावर कठोर कार्यवाही करावी.

श्री.मिलींद दाभाडे : मागील वर्षी सहकार एजन्सीचा जे ठराव सभागृहापुढे आणला होता त्यावेळी एजन्सीधारक परप्रांतातल्या तडीपार गुंडांचा वापर करून वसुली करतात असे होऊ नये म्हणून ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणुन देण्यात आली होती. त्यावेळी या बाबीची खबरदारी घेतली जईल असे आश्वासनही देण्यात आले होते. पण सर्वसामान्य नागरीक, व्यापारी तर दुरच राहिले त्यांनी नगरसेवक आणि विरोधी पक्षनेता पदावर असलेल्या पदाधिकाऱ्यावरही त्यांची दादागिरी झाली आहे ती आम्ही सहन केली नाही. त्याठिकाणी असलेल्या जकात अधिक्षक यांची एजन्सी धारक किंमत ठेवत नाही. त्या ठिकाणी फारूक नावाचा एक गुंड ठेवलेला आहे तो सर्वसामान्य नागरीकांना आणि व्यापाऱ्यांना त्रास देतो तेव्हा यापुढे तो तिथे असता कामा नये. त्यावर प्रशासन काय कार्यवाही करणार.याचा खुलासा करावा त्यानंतर या विषयावर शिक्कामोर्तब करावे.

श्री.रविकांत गवळी : स.सदस्यांनी गंभीर मुद्दे सभागृहापुढे मांडले आहेत. भविष्यामध्ये असा प्रकार घडता कामा नये महानगरपालिकेचे प्रमुख उत्पन्न असलेल्या जकातीमधुन शहराच्या प्रत्येक वार्डातील मुलभूत सुविधा पुरविल्या जतात. सन २००६-२००७ या वर्षाकरीता जेउद्दीष्ट ठरवून देण्यात आले आहे. ते एजन्सीने पुर्ण केले आहे. मागील वर्षातील ज्या त्रृटी स.सदस्य यांनी दाखविल्या आहेत त्याची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घेऊन ठराव मंजूर करण्यास हरकत नाही.

श्री.मुजीब खान : एका वर्षात१० पट जकात वसुलीतून किती उत्पन्न झाले त्याची सविस्तर यादी देण्यात यावी.

श्री.संजय शिरसाठ : दरवर्षी प्रमाणे यावर्षी जकात खाजगी करणाची निविदा सभागृहापुढे आली आहे. जकातीचे खाजगीकरण झाले पाहिजे आणि खाजगीकरणातून महानगरपालिकेला जस्त उत्पन्न झाले पाहिजे त्यातुन या शहराचा विकास होईल.गेल्या दोन वर्षात खाजगीकरणातून ३०/४० कोटीचा फायदा झाला. एका अर्थाने हे मान्य झाले की महानगरपालिकेचे अधिकारी कर्मचारी जे काम करू शकले नसते हे खाजगीकरणातून झाले आहे. धोरणात्मक निर्णय या दृष्टीने जकातचे खाजगीकरण करावे किंवा नाही याबाबत सर्वसाधारण सभेत या सभेत वादविवाद घातला होता. त्यावेळी सभागृह नेता या नात्याने

मी बोललो होतो की जकातीचे खाजगीकरण झाले पाहिजे, महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजेआपण लोकांना नावे ठेवण्यापेक्षा आपल्या कर्मचाऱ्यांना नावे ठेवण्यापेक्षा कर्मचारी जेचोरी करतात असे जेप्रशासनाचे व नगरसेवकाचे मत झाले आहे हे जर आपण मान्य केले तर हे १२५ कर्मचारी आहेत ते त्याठिकाणहून काढून मालमत्ता कराच्या वसुलीच्या ठिकाणी टाकण्यात आले आहे. आणि त्यांना चांगल्या कामाला म्हणजेच वसुलीचे काम त्यांच्याकडून करून घेण्यात येईल. त्याचा चांगला परिणाम आपल्याला दिसुन आला. जकात वसुलीचे जेअंदाजपत्रक ठरविण्यात आले होते ते स्थायी समितीच्या मंजुरीसाठी येणे आवश्यक होते असे माझे ठाम मत आहे. हे सर्व होत असतांना काही जण न्यायालयात गेले यात महानगरपालिका जिंकली आणि रिट पिटीशन फेटाळण्यात आले. महानगरपालिका याचा अर्थ माझ्या मते सर्वसाधारण सभा असा असेल मला एक शंका आहे म्हणून विचारतो की, मागील वेळी जेव्हा निविदा प्रसिध्द केल्या त्यात तीन निविदा रद्द करण्यात आल्या उर्वरीत दोन निविदाधारकाशी खाजगी वाटाघाटी प्रशासनाला कराव्या वाटल्या नाहीत. माझं असं मत आहे की त्यांची जी ११० कोटी ५ लाखाची निविदा होती त्यांच्याशी आपण खाजगी वाटाघाटी करू शकलो असतो. परंतु पहिले टेंडर रद्द केले त्याची कारणं या ठिकाणी नमुद केली नाही. यात मुळ भांडण जेआहे ते अधिकार स्थायी समितीचे आहे की सर्वसाधारण सभेचे आहे.

मा.आयुक्त : पहिल्यांदा ज्या निविदा मागविल्या त्यात दोन गोष्टी अशा होत्या की यात एका निविदाधारकाशी फोनवर संपर्क साधला असता त्यांनी असे सांगितले की आमच्याकडे अनुभव आहे. आपण जर अटीसह टेंडर मंजुर करणार असाल तर आम्ही अटीप्रमाणे अनुभवाचे प्रमाणपत्र आणुन देतो. दुसऱ्या निविदाधारकाने वाटाघाटीसाठी येण्यास अमान्य केले होते. म्हणून आपल्याकडे वेळ आहे असा विचार करून ७ दिवसात पुन्हा प्रयत्न केला त्यात आपल्याला जवळपास १ कोटीचा फायदा झाला.

श्री.संजय शिरसाठ : हा विषय अनेक पध्दतीने मांडता आला असता परंतु स्थायी समितीमध्ये विषय आल्यानंतर आत्ताच एका विषयात रिकॉलचा निर्णय दिल्याप्रमाणे त्या कामासाठी निविदा वाढवुन आली तर ठिक नसता कमी आली तर स्थायी समितीवर गदा येते. ही निविदा मंजुर करावी अशी मी विनंती करतो.

श्री.पुनमचंद बमणे : एजन्सीधारका मार्फत जे कर्मचारी ठेवले जतात त्यांचे पोलीस विभागाकडून वर्तणुक प्रमाणपत्र घेण्यात यावे.

श्री.मिलींद दाभाडे : फारूक नावाचा जे गुंड आहे त्याला त्या ठिकाणी त्यांनी ठेऊ नये.

श्री.मधुकर सावंत : स.स.श्री.पुनमचंद बमणे आणि श्री.मिलींद दाभाडे यांनी जे मुद्दा उपस्थित केला आहे त्यानुसार फारूक नावाचा जे गुंड आहे. त्याला काढून टाकण्यात यावे आणि नागरीकांना त्रास होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

मा.सभापती : सर्व स.सदस्यांनी या विषयावर आपले मत मांडले आहे. यात ज्या त्रुटी दिसल्या होत्या त्यात स.स.श्री.मुजेब आलम शाह, श्री.पुनमचंद बमणे, श्री.मो.जवेद, श्री.मिलींद दाभाडे यांनी जे मुद्दे मांडले आहेत त्या गोष्टीकडे प्रशासनाने काटेकोरपणे लक्ष द्यावे. आणि सर्वांच्या संमतीने या प्रस्तावास मंजुरी देण्यात येतेण

श्री.मुजेब खान : माझा या प्रस्तावाला विरोध नोंदवावा. मी नेहमीच शहरातील नागरीकांच्या बरोबर राहणार आहे.

मा.सभापती : स.स.श्री.मुजेब आलम शाह यांचा विरोध नोंदवून घेण्यात यावा. इतर सर्व स.सदस्यांच्या सहमतीने हा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन 2007-2008 साठी औरंगाबाद महापालिका हद्दीत आयात होणाऱ्या मालावरील जकात खाजगी अभिकर्त्यामार्फत वसुल करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी जास्त देकार असलेले निविदाधारक मे.सहकार एजन्सीज् प्रा.लि. मुंबई यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार रक्कम रू. 111,06,00,000/- (अक्षरी रूपये एकशे अकरा कोटी सहा लक्ष फक्त) चा देकार असलेली निविदा स्विकारणेस व दि. 1 मार्च 2007 ते 29 फेब्रुवारी 2008 या कालावधीसाठी मे. सहकार एजन्सीज् प्रा.लि. मुंबई यांची जकात वसुली करण्यासाठी **"खाजगी अभिकर्ता" म्हणून नियुक्ती करण्यास बहुमताने मंजुरी देण्यात येते.** वैधानिक कार्यवाही व्हावी. तसेच सभागृहातील चर्चेनुसार खाजगी अभिकर्त्याकडून जकात वसुलीच्या कामात गुंड प्रवृत्तीच्या लोकांचा वापर केला जाणार नाही व व्यापारी, नागरीकांना त्रास होणार नाही याची प्रशासनामार्फत दक्षता घेण्यात यावी.

**विषय क्र.242 :**

कार्यकारी अभियंता (ज.नि.,वि.इ.व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.26 येथे जिम्नॅशियम हॉल बांधणे करीता सा.बां. विभागाच्या सन 2005-06 च्या जिल्हा दरसूचीनुसार र.रू.15,99,900/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी स्थायी समिती समोर सादर करण्यास्तव शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2006-07 या आर्थिक वर्षा अंतर्गत **व्यापारी संकुले व इतर इमारती** या लेखा शिर्षाखाली करण्यात येईल. त्यानुसार र.रू.15,99,900/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.26 येथे जिम्नॅशियम हॉल बांधणे करीता तयार करण्यात आलेल्या र.रू.15,99,900/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.243 :**

कार्यकारी अभियंता (ज.नि.,वि.इ.व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन 1993-94 पासून महानगरपालिका औरंगाबाद तर्फे एमआयडीसी वाळूज येथील अग्निशमन दल चालविण्यात येत आहे. सन 1994 पासून एमआयडीसी वाळूज येथील अग्निशमन दलात कार्यरत महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांवर होणारा सर्व खर्च जसे मासिक वेतन, भत्ते व इतर खर्च एमआयडीसी वाळूज प्रतिवर्षी अदा करीत आहे. दि.14-1-2002 रोजी महानगरपालिका औरंगाबाद व एमआयडीसी कार्यालयाचे अधिकारी यांच्यात संपन्न झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार महानगरपालिकेस कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाऐवजी ठराविक रक्कम रू.12,00,000/-(रूपये बारा लक्ष मात्र) प्रतिवर्षी एमआयडीसी हे देण्यास तयार आहेत.

सन 1994 पासून (एमआयडीसी वाळूज येथे अग्निशमन विभाग सुरू झाल्यापासून) ते 2006 पर्यंत एमआयडीसी वाळूज अग्निशमन दलाने एकूण 703 कॉल अटेंड केले आहेत. त्यापैकी 411 कॉल हे एमआयडीसी हद्दीमधील असून, 292 कॉल्स हे एमआयडीसी हद्दी बाहेरील आहेत.

**एम.आय.डी.सी. वाळूज अग्निशमन दलाचा तपशील खालील प्रमाणे.**

1) एम.आय.डी.सी. वाळूज अग्निशमन दलासाठी सन 1993-94 ते 2006 पर्यंत एकुण खर्च रूपये 1,56,23,600/- इतका झालेला आहे.
2) एमआयडीसी वाळूज कडून महानगरपालिकेस आज पर्यंत एकुण वसुली रूपये 1,01,51,740/- इतकी झालेली आहे.

3) एमआयडीसी वाळूज कडे रूपये 54,71,860/- बाकी आहे.
4) एमआयडीसी वाळूज अग्निशमन विभागास मिळालेल्या एकूण कॉल्स पैकी, अग्निशमन दलाने एमआयडीसी हद्दी बाहेरील 292 कॉल्स हाताळलेले आहेत. म्हणजेच वाळूज एमआयडीसी अग्निशमन दलाचा वापर हा एकुण खर्चाच्या 41.53% एमआयडीसी व्यतिरिक्त त्याच्या हद्दी बाहेरील कॉल्ससाठी झालेला आहे. म्हणजेच रूपये 64,88,481/- हा खर्च एमआयडीसी व्यतिरिक्त झालेला आहे.
5) एमआयडीसी वर निव्वळ खर्च रूपये 91,35,119/- इतका झालेला आहे.
6) एमआयडीसी कडून आजपर्यंत रू.1,01,51,740/- वसूल झालेले आहेत.
7) एमआयडीसी व महानगरपालिका यांच्या दरम्यान करारनामा झाल्यास एमआयडीसी महानगरपालिकेस थकबाकीपोटी सध्या रूपये 40,00,000/- देण्यास तयार आहे, त्यामुळे हा करारनामा झाल्यास त्यात महानगरपालिकेचा फायदा होणार आहे.
8) अग्निशमन केंद्र एमआयडीसी वाळूज येथे प्राप्त झालेले 703 कॉल्स पैकी एमआयडीसी हद्दीतील 411 व हद्दी बाहेरील 292 कॉल्सचा सविस्तर तक्ता सोबत देण्यात येत आहे.
9) एमआयडीसी वाळूज अग्निशमन दलाचा सन 1993 ते 2006 पर्यंतचा खर्च व उक्त प्रमाणे परतावा बाबतचा तक्ता सोबत देण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.डीएमयु-2006/सीआर-11/डीएम-1, दिनांक 25 जुलै 2006 नुसार राज्यात प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन करणेसाठी औरंगाबाद मुख्यालया अंतर्गत औरंगाबाद, जालना व बीड हे तीन जिल्हे देण्यात आलेले आहेत. सदरील प्रादेशिक आपत्कालीन व्यवस्थापन केंद्र अंतर्गत काम करतांना औरंगाबाद येथील वाहने आपत्तीच्या वेळी शहराबाहेर पाठवावी लागणार आहेत. त्यामुळे पर्यायाने एमआयडीसी वाळूज यांना देखील आपली सेवा द्यावी लागणार आहे. या पार्श्वभूमीवर रूपये 12,00,000/- प्रतिवर्ष खर्चाचा परतावा एमआयडीसी कडून घेण्यासठी एमआयडीसी वाळूज यांचेशी करारनामा करणेस हरकत नाही.

तरी उपरोक्त शासन निर्णय व आकडेवारी पाहता एमआयडीसी वाळूज सोबत दिनांक 14-1-2002 रोजी संपन्न झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे (M.O.U.) कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाऐवजी ठराविक रक्कम रूपये 12,00,000/- (रूपये बारा लक्ष मात्र) प्रतिवर्षी एमआयडीसी यांचेकडून घेण्याबाबतचा करारनामा करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतर्फे चालविण्यात येणाऱ्या एमआयडीसी वाळूज येथील अग्निशमन दलवरील खर्चाच्या संदर्भात एमआयडीसी वाळूज सोबत दिनांक 14-1-2002 रोजी संपन्न झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे (M.O.U.) कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाऐवजी ठराविक रक्कम रूपये 12,00,000/- (रूपये बारा लक्ष मात्र) प्रतिवर्षी एमआयडीसी यांचेकडून घेण्याबाबतचा करारनामा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद